
# माणूस



नेपाळ आणि चार पुणेकर

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : पाचवा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक :
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. जून, १९

दि. १५ जूनच्या अंकातील श्री. विजय तेंडुलकर यांनी माझ्याविषयी लिहिलेला 'चेहरा' वाचला. लेख फारच वैशिष्ठ्यपूर्ण वाटला.

या लेखातील पान २४ वरचे, सुरुवातीचे एकच वाक्य मला फार खटकले, (सुलोचनाबाई आपण...... कधी घडला नाही असे म्हणतात.) वास्तविक माझे गुरू श्री. भालजी पेंढारकर यांच्यामुळेच आजची 'सुलोचना' निर्माण झाली आहे. अक्षरशः दगडातून मूर्ती घडविण्याचे श्रम त्यांनी घेतले आहेत. तेव्हा अभिनयाचे शिक्षण अथवा सराव माझ्या संस्कारक्षम वयात मला कधीच घडला नाही, असे मी म्हणणे कृतघ्नपणाचे ठरेल. तेव्हा वरील चुकीच्या वाक्याची नोंद कृपया वाचकांनी घ्यावी.

सुलोचना, मुंबई.

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कथित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

तसे पाहिले तर नगरपालिकांच्या किंवा महापालिकांच्या निवडणुकांचे महत्त्व ज्या त्या शहरापुरते मर्यादित असते. परंतु काही वेळेला परिस्थिती अशी निर्माण होते की, सबंध राज्याला किंवा क्वचित प्रसंगी साऱ्या देशाला या निवडणुकीच्या निकालासंबंधी कुतूहल वाटू लागते. गेल्या वर्षी सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी दिल्ली महापालिकेच्या निवडणुका झाल्या तेव्हा या निवडणुकीत कोणता पक्ष अधिक यश संपादन करतो, याबाबत साऱ्या देशात उत्सुकता निर्माण झाली होती. मध्यंतरी केरळ राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुकांबाबतही अशीच उत्कंठा आढळून आली. नुकत्याच पार पडलेल्या पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीबाबत इतक्या मोठ्या प्रमाणावर उत्सुकता निर्माण झाली नव्हती, ही गोष्ट खरी असली तरी पश्चिम महाराष्ट्रापुरते या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

याचे एक कारण असे होते की, पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी एकसदस्य मतदारसंघ अस्तित्वात येण्याची ही पहिलीच वेळ होती. यापूर्वी पुणे महापालिकेच्या ज्या तीन निवडणुका झाल्या, त्या वेळी अनेकसदस्य मतदारसंघ अस्तित्वात असल्यामुळे प्रत्येक पक्षाला थोडे फार प्रतिनिधित्व मिळविणे सोपे जात असे.

## पुणे महापालिकेची

नव्या पद्धतीनुसार प्रत्येक मतदारसंघातून एकच उमेदवार निवडून द्यावयाचा असल्यामुळे प्रत्येक पक्षाला एकेका जागेसाठी चुरशीची लढत द्यावी लागणार होती. या निवडणुकीसंबंधी उत्सुकता निर्माण व्हायला आणखीही एक कारण होते. गेल्या मार्चमध्ये मुंबई महापालिकेच्या निवडणुका पार पडल्या आणि त्यात बाळ ठाकरे यांच्या शिवसेनेने अनपेक्षित यश संपादन केले होते आणि या यशाची दुंदुभी वाजत असतानाच पुण्याच्या निवडणुकीतही आपण भाग घेणार असल्याचे शिवसेनाप्रमुखांनी जाहीर केले होते. या दोन कारणांमुळे या निवडणुकीच्या निकालाबाबत कोणालाही आगाऊ अंदाज बांधणे अशक्य झाले होते.

या निवडणुकीच्या वेळी पुणे महापालिकेच्या सदस्यांची संख्या पासष्टवरून त्र्याहत्तरवर गेली होती. या वेळी एका मतदारसंघातील मतदारांच्या यादीबाबतचे प्रकरण न्यायालयात गेल्यामुळे बहात्तर जागांसाठीच ही निवडणूक झाली. या बहात्तर जागांसाठी जवळ जवळ चारशे उमेदवार उभे होते. अर्थात नेहमीप्रमाणे अपक्ष उमेदवारांच्या उत्साहामुळेच ही संख्या फुगली होती. अपक्ष उमेदवारांचा प्रश्न बाजूला ठेवला तर या निवडणुकीमध्ये काँग्रेस आणि नागरीक संघटना यांनी जवळ

जवळ सर्व जागांसाठी आपले उमेदवार उभे केले होते. याशिवाय जनसंघ आणि शिवसेना हे दोन पक्षही निम्म्या जागा लढवीत होते. शिवाय जनता आघाडी, कम्युनिस्ट पक्ष, हिंदुमहासभा आदी पक्षांनी आपले उमेदवार उभे केले होते. परंतु या पक्षांच्या उमेदवारांची संख्या नगण्य होती आणि त्यामुळे कांग्रेस, नागरीक संघटना, जनसंघ आणि शिवसेना असे या सामन्याचे चौरंगी स्वरूप होते.

काँग्रेसने रिपब्लिकन (गायकवाड गट) पक्षाशी निवडणूक-करार केला असल्यामुळे हरिजनांसाठी राखून ठवलेल्या जागा काँग्रेसने रिपब्लिकन पक्षासाठी मोकळ्या ठेवणे अपरिहार्य होते याशिवाय आणखी एक जागाही काँग्रेसने मोकळी ठेवली. त्या मतदारसंघातून श्री. पां. गो. सातव अपक्ष म्हणून उभे राहिले होते. तेथे काँग्रेसने आपला उमेदवार उभा केला नाही. याचे साधे कारण सातव निवडून आले असते तर ते महापालिका काँग्रेस पक्षात समाविष्ट होणार होते. सातव यांच्यासंबंधी एवढे औदार्य दाखविणे काँग्रेसला भागच होते. कारण गेल्या निवडणुकीत जनसंघाच्या तिकिटावर निवडून आलेल्या सातवांनी उपमहापौरपदाच्या खुर्चीची ऊब लाभावी यासाठी आपल्या पक्षाशी बेइमानी केली होती. (अर्थात गाढवही गेले

## गाजलेली निवडणूक

आणि ब्रह्मचर्यही गेले असा प्रकार त्या वेळी सातव यांच्या बाबतीत घडला ही गोष्ट वेगळी.) आम्ही कोणत्याही 'आयाराम-गयाराम' ला थारा देणार नाही असा दावा करणाऱ्या काँग्रेसने सातवमहाशयांसाठी जागा मोकळी सोडून हा दावा किती लटका आहे हे निवडणुकीपूर्वीच सिद्ध केले होते. याशिवाय शहर काँग्रेसमधील काही मुरब्बी कार्यकर्त्यांनी आपल्या पक्षाच्या अधिकृत उमेदवारास डावलून तथाकथित अपक्षांच्या यशाला हातभार लावला. ज्या ठिकाणी आपल्या पक्षाच्या उमेदवारास तिकीट मिळाले नाही तेथे हा प्रकार अधिक तेजीत होता.

काँग्रेस–रिपब्लिकन ही एक युती तर नागरीकसंघटना म्हणजे संयुक्त समाजवादी आणि प्रजा समाजवादी यांची युती होती. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत संपूर्ण महाराष्ट्र समिती उतरली होती. त्यामुळे साहजिकच तेथे समितीतील संयुक्त समाजवादी आणि समितीबाहेरील (शिवसेनेशी हातमिळवणी केलेले) प्रजासमाजवादी यांच्यांत लढत झाली. पुण्याच्या निवडणुकीत संपूर्ण महाराष्ट्र समिती अदृश्य झाली आणि तिची जागा 'महापालिकेत राजकारण नको' असा सूर लावणाऱ्या नागरीक संघटनेने घेतली. या संघटनेत प्रामुख्याने समाजवाद्यांचाच भरणा आहे.

मुंबई महापालिकेत राजकीय पक्षांनी प्रवेश करणे आवश्यक वाटणाऱ्या या दोन समाजवादी पक्षांना पुण्यातच सोवळेपणा आठवावा यातदेखील आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कारण गेल्या वर्षभरात या समाजवाद्यांचो संयुक्त आघाड्यांच्या राजकारणात इतकी फटफजिती झाली आहे, की राजकीय चारित्र्याचा आणि सार्वजनिक जीवनातील आचार संहितेचा उल्लेख करण्याचाही त्यांना अधिकार उरलेला नाही. १९६२ मध्ये झालेल्या पुणे महापालिकेच्या निवडणुकीत नागरीक संघटनेला, काँग्रेस पेक्षा दोन जागा जास्त मिळाल्या होत्या आणि त्यामुळे प्रारंभी या संघटनेचे सदस्य महापौरपदी निवडून येत असत. पण या महापौरपदाच्या राजकारणापायी ही संघटना इतको मोडकळीस आली, की नागरी हिताच्या रक्षणाचा पुकारा करणाऱ्या या संघटनेने सत्तास्पर्धेच्या क्षेत्रात आपण काँग्रेसच्या पातळीवरच आहोत हे दाखवून दिले होते. तरीही या वेळेस या संघटनेने सत्तर जागांसाठी उमेदवार उभे करून पुण्याच्या कारभाराची सूत्रे हाती घेण्याचा मनसुबा केला होता.

## राजकीय विनोद

याशिवाय आणखी एक गमतीची युती म्हणजे शिवसेना आणि हिंदुमहासभा यांची. हिंदुसंघटन हे आपले ध्येय मानणाऱ्या हिंदुमहासभेने 'महाराष्ट्र महाराष्ट्रीयांसाठीच' अशो अतिरेकी आणि संकुचित भूमिका घेणाऱ्या शिवसेनेचा हात धरून निवडणुकीच्या बोहोल्यावर चढावे यापरता राजकीय विनोद आढळणे अशक्य आहे.

या सर्व परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोणाशीही हातमिळवणी न करता केवळ आपल्या पक्षाचा कार्यक्रम लोकांपुढे ठेवून त्या आधारावर निवडणुका लढविण्याचा जनसंघाचा निर्णय कौतुकास्पद मानावयास हवा. अर्थात या पक्षाचे सामर्थ्य केवळ पश्चिम भागातच एकवटले असल्यामुळे या पक्षास निर्विवाद बहुमतांची आकांक्षा बाळगावयास वाव नव्हता. जनसंघास ज्या विभागांमध्ये यश मिळाले ते पाहिल्यानंतर अद्याप या पक्षाला शहराच्या पूर्व भागात पायारोवा करता आलेला नाही हेच सिद्ध होते. डेक्कन जिमखाना, सदाशिव पेठ, नारायण पेठ, शनिवार पेठ, कसबा पेठ आणि काही प्रमाणात शुक्रवार आणि बुधवार पेठा एवढ्या विभागातील बहुसंख्य म्हणजे चौदा जागा जनसंघाने मिळविल्या आहेत. अर्थात हेही यश एकसदस्य मतदारसंघांच्या संदर्भात कमी महत्त्वाचे नाही. परंतु अद्याप बराच पल्ला गाठावयाचा आहे हेही त्यावरून उघड होत आहे.

काँग्रेसला चौतीस आणि नागरीक संघटनेला सतरा जागा मिळाल्या. काँग्रेसच्या यशापेक्षाही नागरी संघटनेचा पराभव अधिक बोलका आहे. एकीकडे महानगरपालिकेत राजकारण नको असा दावा करायचा आणि दुसरीकडे प्रामुख्याने राजकीय कार्यकर्त्यांनाच तिकिटे द्यायची असा दुटप्पी डाव खेळून समाजवाद्यांनी ही निवडणूक लढविली. यापैकी ज्यांच्याजवळ लोकसेवेची पावती होती किंवा ज्यांनी आपली थैली मोकळी सोडली अशा उमेदवारांना या निवडणुकीत यश लाभले. इतर सर्व

समाजवादी उमेदवारांची अक्षरशः दैना उडाली. संयुक्त समाजवाद्यांना काही प्रमाणात तरी यश लाभले. प्रजासमाजवादी पक्षाचा मात्र एकही उमेदवार निवडून येऊ शकला नाही. मुंबईच्या निवडणुकीत कम्युनिस्टांशी संगनमत करणारे संयुक्त समाजवादी आणि शिवसेनेशी सोयरिक करणारे प्रजासमाजवादी पुण्यात एकत्र येऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरले असताना त्यांना एवढा दारुण पराभव का स्वीकारावा लागला याचा या पक्षाच्या नेत्यांनी शोध घेतला पाहिजे. अर्थात तसे होण्याची शक्यताही कमीच आहे. कारण गेल्या वर्षीच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर या दोन्ही समाजवादी पक्षांची जी फरफट सुरू झाली आहे आणि तिच्यासंबंधी या दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी जे औदासीन्य दाखविले आहे ते लक्षात घेता केवळ समाजवादाच्या पायावर उभे राहण्याचा निर्धार दाखविण्याची कुवत त्यांच्या अंगी राहिली आहे असे वाटत नाही. एकीकडे जातीयतेचा निषेध करायचा आणि दुसरीकडे अल्पसंख्याक समाजाची मते मिळावीत म्हणून मुस्लीम लीगचा भस्मासूर जागा करायलाही अनमान करायचे नाही अशा पक्षांनी समाजवादी शक्तींच्या गेल्या वीस वर्षांतील पद्धतशीर पिछेहाटीचा केव्हातरी विचार करावयास हवा.

मुंबईच्या पाठोपाठ आपण पुणेही काबीज करू असा विश्वास बाळगणाऱ्या शिवसेनेस पुण्यास अवघी एक जागा मिळाली आणि तीही केवळ अकरा मतांनी. मुंबईतल्या मराठी माणसाला आपले जीवन कुचंबल्यासारखे वाटते आणि त्या वेळी

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

**डोंगरे**

**अप्सरा**

हेअर ऑईल

उत्पादक

**के. टी. डोंगरे ॲण्ड कं., प्रा. लि.,**

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

**डोंगरे बालामृताचे**

निर्माण झालेल्या उद्वेगाला तोंड फुटावे म्हणून मुळात तो संकुचित प्रवृत्तीचा नसूनही शिवसेनेसारख्या प्रच्छन्न, संकुचित आणि झुंडशाहीवर भिस्त ठेवणाऱ्या संघटनेच्या मागे उभा राहतो. पुण्यातील निवडणुकीच्या निमित्ताने शिवसेना प्रमुख बाळ ठाकरे (त्यांचे अनुयायी, त्यांचा 'सेनापति' असा आवर्जून उल्लेख करतात.) यांची भाषणे ऐकण्याचा योग आला. 'माझ्या शिवसैनिकांकरवी मी अमक्यातमक्या गोष्टीचा बंदोबस्त करीन.' हे त्यांच्या तोंडून वारंवार ऐकावयास मिळणारे वाक्य शिवसेनेला जर कधी काळी सत्ता प्राप्त झाली तर तिची पावले कशी पडतील याची ओळख करून देण्यास पुरेसे आहे. ही असली भाषा टाळ्या मिळविण्यासाठी उपयुक्त ठरत असली तरी त्यामुळे मते मिळत नाहीत हे निदान पुण्याच्या अनुभवा-वरून तरी सेनापतींच्या ध्यानी येण्यास प्रत्यवाय नसावा.


पुण्याच्या मतदारांनी कोणत्याच पक्षास निर्विवाद बहुमत प्राप्त करून दिले नसले तरी काँग्रेस पक्ष बहुमताच्या खूपच जवळ आहे. नागरीक संघटना आणि जनसंघ यांनी काँग्रेस विरोधाच्या समान भूमिकेमुळे परस्परांशी तडजोड केली तरीदेखील त्यांचे सामर्थ्य काँग्रेसपेक्षा किंचित कमीच आहे. अशा परिस्थितीत जे सहा अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत त्यांच्या हातीच तराजूची मधली दांडी गेलेली आहे. ज्यांना कोणत्याच विचारसरणीचे सोयरसुतक नाही अशांच्या हाती महापौरपदाची तागडी कोणाच्या बाजूने झुकवायची याची सूत्रे जाणे ही गोष्ट मुळीच हितावह नाही. परंतु जे घडले आहे ते असे आहे. त्यामुळे साहजिकच या अपक्षांना राजी राखण्यातच उभय गटांचे श्रम खर्ची पडणार आहेत. आजवरचा अनुभव पाहिला तर या कलेत काँग्रेसइतका कोणताच पक्ष वाकबगार नाही. त्यातून पुण्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांना या मार्गावरच्या सर्व वाटा गेल्या कित्येक वर्षांच्या अनुभवाने पाठ झालेल्या आहेत. त्यामुळे येत्या चार वर्षांत पुण्याच्या महापालिकेत कोणते चित्र दिसणार याबद्दल अंदाज बांधणे फारसे अवघड नाही. ○

— एक पुणेकर

चाटुकार गीता–

आयाराम–गयारामौ निःश्रेयसकरावुभौ ।
ययोस्तु दास्यमात्रेण पदवीं प्राप्यते नरः ॥


— गो. नी. दांडेकर



## कविता

तू खूपशी काही दवात भिजणाऱ्या पहाटेसारखी
तू खूपशी काही वेगाने येणाऱ्या लाटेसारखी
हातांत तुझ्या एक ओंजळ मांगल्याची
न संपणाऱ्या रात्रीच्या भोगातील निर्माल्याची
तू खूपशी काही तुझ्यासारखीच...
रात्रीचा शेला पांघरून ठिबकणाऱ्या चंद्रासारखी
गालावरची लाली भांगेतल्या कुंकवाची ओळख सांगणारी
हिरवा शालू, हिरवा चुडा, गोऱ्या हाती केतक केवडा आणणारी
तू खूपशी काही सर्वांसारखी...
उंबरठ्यावरचे माप लवंडून येणारी
घसरत्या पदराने घाबरणारी...घुसमटणारी
नव नव्हाळीतील नवलाईने ओथंबणारी
तू खूपशी काही माझ्यासारखी...
सारं-सारं सांगून विसरणारी
जवळ येऊन अवघडणारी
पिचल्या चुड्याला घाबरून म्हणणारी
...अहोऽ हळू...बांगडी वाढली ना माझी...

— प्रकाश कामतीकर



# अन्नपूर्णा
आणि
# धवलगिरी

“**न**ही चलेगा साब !”


“क्यों ?”

“ये इंडिअन करन्सी है।”

नेहमीच्या सवयीप्रमाणे मी चहावाल्यापुढे पंचवीस पैशाचे नाणे टाकले. त्याच्या या उद्गारांनी मात्र माझी तंद्री एकदम भंग पावली. भारताची सरहद्द ओलांडून नुकताच आम्ही नेपाळमध्ये प्रवेश केला होता.

भारत आऊटवर्ड बाऊंड पायोनिअर्स या आमच्या संस्थेतर्फे दरवर्षी देशाटनाचा कार्यक्रम आखला जातो. गतवर्षी गिर्यारोहण मोहीम झाली. या वर्षी ठरले की

१



प्रा. त्रिपाठी, प्रा. गोळे, प्रकाश गोळे, श्री. बडवे

नेपाळमधील अपरिचित अशा पश्चिम भागात पर्यटन करावयाचे आणि जमेल तितकी भौगोलिक, भूशास्त्रीय वनस्पतीविषयक अशी शास्त्रीय माहिती जमा करावयाची. तराई आणि शिवालिक टेकड्यांमधून मार्ग काढीत कृष्ण गंडकी नदीच्या खोऱ्यात शिरावयाचे आणि नदीतीराने, या नदीने केलेल्या प्रचंड घळईमधून हिमालयाच्या सर्वोच्च रांगा पार करून तिबेटच्या पठाराचे अवलोकन करायचे असा हा कार्यक्रम होता.

पुण्याहून या मोहिमेवर निघालेल्या या तुकडीत आम्ही होतो चौघेजण. स. प. कॉलेजमधील भूगोलाचे प्राध्यापक दा. रा. गोळे, महाराष्ट्र ॲसोशिएशन फार दी काल्टिव्हेशन ऑफ सायन्स या संस्थेतील वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. वा. द. वर्तक आणि भूशास्त्रज्ञ रमेश बडवे, आणि मी. पक्ष्यांचे निरीक्षण आणि रंगीत फोटोग्राफी ही कामे माझ्याकडे होती.

आमच्या बसने गोरखपूर सोडले आणि मन विचारांच्या तंद्रीत गुरफटले. नेपाळ-तराईतील ती घनदाट जंगले—त्यांना भिडलेल्या उंच उंच पर्वतराजी, आकाशाला

— — — — —

प्रकाश गोळे

— — — — —

भेदून जाणारी हिमाच्छादित शिखरे. नेपाळ—एक हिंदु—राष्ट्र, जगातील एकमेव ! (हिंदु—राष्ट्र म्हणजे काय असेल बुवा ?)

'लुम्बिनि, भगवान बुद्धका जन्मस्थान, २५ मील।' वाटेतल्या एका फलकाने माझे लक्ष वेधून घेतले. लुम्बिनि, जनकराजाचे जनकपूर—सीतेचे बालपण या भागातच गेले असणार. आपण पुराण-प्रदेशात तर प्रवेश करीत नाही ना ?

पण बस सरहद्दीवर थांबली अन् पुराणकालिन विचारांचे पटल एकदम गळून पडले. बसस्टँडवरची ती झुंबड, गोंगाट, आजूबाजूची गलिच्छता, चहाच्या दुकानात कर्कश ओरडणारा रेडिओ, हमालांचा गळेपडूपणा, रिक्षावाल्यांच्या घंटा—सर्व चालू काळाच्या निशाण्या. नेपाळही आधुनिक बनला आहे तर !

"इथून विमानाने जाण्यापेक्षा ट्रकने पोखऱ्यापर्यंत जाऊ या. मधला प्रदेश तरी पाहायला मिळेल." इती प्राध्यापक.

"ट्रक-सर्व्हिस निश्चित चालू झालेली आहे का ?" माझी शंका.

"बुटवलला जाऊन चौकशी करू."

"बरं का, बुटवलला खैरे भेटतात का बघू. शिरोळच्यांनी त्यांचा पत्ता दिलाय्."—डॉ. वर्तक.

बुटवलला जाणाऱ्या बसमध्ये आमचे सामान चढले. दूरवर शिवालिक डोंगराची रांग क्षितिज व्यापून राहिली होती. तराईत प्रवेश केला पण ते घनदाट जंगल कुठं होतं ! ते केव्हाच तोडून टाकले गेले. काही ठिकाणी झाडांचे गुच्छ राहिले होते तेवढीच त्याची खूण. दमट हवेमुळे घामाच्या धारा गळत होत्या. तराईची ती प्रसिद्ध दलदल केव्हाच वाळून गेली होती. येथे एका काळी दलदल होती याचा पुरावा म्हणजे चार खांबांवर जमिनीपासून सात-आठ फूट उंच बांधलेली घरे. बुटवलजवळ तराईचे हें सपाट मैदान एकदम तुटते आणि शिवालिक डोंगरांना सुरुवात होते. डोंगर आणि सपाट प्रदेश यांना विभागणारी रेषा स्पष्ट दिसते. परत येताना विमानातून तर हा छेद चांगलाच जाणवतो.

सुनौली—पोखरा मार्गावरील बुटवल हे दुसरे मोठे गाव. पहिले सरहद्दीनजीकचे भैरवा. तेथून पोखरा व पुढे काठमांडू येथे जाण्यासाठी विमाने सुटतात. सुनौली या भारतीय हद्दीतील गावापासून पोखऱ्यापर्यंत १२८ मैलांचा मोटार-रस्ता तयार करण्याचे काम भारतीय सहकार्याने सुरू आहे. या मार्गाला नाव दिलेले आहे, सिद्धार्थ राजपथ. केंद्र सरकारच्या बांधकाम खात्यातर्फे हा रस्ता बांधला जात आहे. नेपाळमध्ये भारतीय सहकार्याने जी अनेक बांधकामे चालली आहेत त्यातील हा एक प्रमुख प्रकल्प. तराईतील पहिले वीस मैल सोडले तर हा संपूर्ण घाट—रस्ता आहे, डोंगर फोडून बांधलेला आहे. छोट्या—मोठ्या दऱ्या, नद्यांनी पाडलेल्या खोल घळई यांना पार करण्यासाठी एकूण १५ मोठे व १८ छोटे पूल बांधावे लागणार आहेत. त्याशिवाय पर्वतावरून कोसळणाऱ्या पाण्याला वाट देण्यासाठी ठिकठिकाणी

जवळजवळ हजार सांडवे बांधावे लागले आहेत. कच्चा रस्ता तयार झाला असल्याने जीप व ट्रक यांना मार्ग खुला करण्यात आलेला आहे. ट्रकने जाता येईल ही आशा आम्ही बाळगून होतो ती एवढ्याचसाठी.

या मार्ग-शासनाचे कार्यालय बुटवलला आहे. फर्ग्युसन कॉलेजच्या प्रा. शिरोळ्यांनी आवर्जून सांगितले होते, की आपले विद्यार्थी श्री. खैरे हे तेथे एक बडे अधिकारी आहेत त्यांना जरूर भेटा. साहेब आहेत की नाहीत याची टेहळणी करण्यासाठी आम्ही वर्तकांना पुढे पाठविले.

" साहेब बोलवताहेत. " थोड्याच वेळात वर्तक येऊन म्हणाले.

एका मृदुभाषी, मध्यमवयीन गृहस्थाने हसून आमचे स्वागत केले. प्रत्येकाची आस्थेने विचारपूस झाली. साहेब भूशास्त्राचे अभ्यासक निघाले. त्यामुळे बडव्यांशी त्यांचे विशेष सूत जमले. सुनौली-पोखरा रस्त्यालगतच्या खडकांची भूशास्त्रीय वशिष्टये दाखविण्यासाठी साहेब त्यांच्या जीपमधून काही मैल आम्हाला घेऊन जाणार होते.

## लॅमरगीयरचे दर्शन

दुसऱ्या दिवशी खैरे यांच्याबरोबर जीपने पुढे निघालो. बुटवलपासून ४० मैलांवर रामदीघाट येथे या मार्गाला कृष्ण गंडकी नदी प्रथमच ओलांडावी लागते. या नदीच्या घळईवर प्रचंड पूल बांधण्याचे काम येथे सुरू होते. तेथपर्यंत खरे आम्हाला सोडणार होते. वाटेत जागोजागी जीप थांबवून प्रा. गोळे आणि बडवे भौगोलिक व भूशास्त्रीय वैशिष्ट्यांची माहिती घेत होते. डॉ. वर्तकांचा कोयताही वेगाने चालत होता. वनस्पतींच्या नमुन्यांची भर त्यांच्या पेटिकेत पडत होती. जीप थांबली की आजूबाजूच्या वृक्षांवर दुर्बिण रोखून मी पक्ष्यांचा वेध घेत होतो.

" तो कोणता पक्षी ? " बडव्यांनी विचारले. एका विस्तीर्ण दरीवर एक प्रचंड पक्षिराज पंख पसरून संथ घिरट्या मारीत होता. एवढ्यात त्याने आपल्या चोचीतून काही तरी खाली टाकले. दुसऱ्याच क्षणी त्याने खाली झेप घेतली अन् ती वस्तू पुन्हा उचलली. आकाशात एक भरारी मारून तो वर गेला आणि त्याने उंचावरून पुन्हा ती वस्तू खाली भिरकावून दिली. पुन्हा उचलली. माझ्या आनंदास पारावार राहिला नाही. हिमालयातील सर्वांत मोठ्या पक्ष्याचे— लॅमरगीयरचे–दर्शन, अन् तेही पहिल्याच दिवशी. हे यश अपूर्व होते !

रामदीघाटला कृष्ण गंडकीचे प्रथमच दर्शन झाले. अवखळपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या या नदीने सहा-सात हजार फूट उंचीच्या पहाडांना दोन्ही हातांनी दूर लोटून खोल घळई निर्माण केलेली आहे. इतकी खोल की नदीकिनारी वसलेल्या रामदीघाटची उंची फक्त १२०० फूट आहे. आम्ही आता रम्य प्रदेशात शिरलो होतो यात शंकाच नाही. वृक्षांनी लगडलेल्या उंच टेकड्या, गंभीर आवाज करीत वाहणारी गंडकी, नदीकाठची उन्हात चमचमणारी पांढरीशुभ्र पुळणी, झाडीतून

डोकावणारे नीटस रामदीघाट. तेथील विश्रामगृहातून मी खाली पाहिले. नदीने एक कमनीय वळण घेतले होते. वाळूचा एक पांढराशुभ्र पट्टा त्या वळणावर नदीत घुसला होता. टोकाशी त्याला दक्षिण हिंदुस्थानचा आकार आला होता. दृश्य इतके लोभस होते की नदीत डुबी घेतल्याशिवाय कोणाला राहवते! सामान टाकले, टॉवेल घेतले आणि आम्ही नदीकडे तत्काळ पळालो. नदीच्या थंडगार पाण्यात शरीर बुडविले आणि तराईतला तो गुदमरवून टाकणारा उष्मा पार विसरलो.

## लहरी गंडकी

गंडकी नदीच्या लहरी वृत्तीचा प्रत्यय आम्हांला रामदीघाटलाच आला. एका रात्रीत नदीचे पाणी एकदम चढले. नदी पार करण्यासाठी येथे एक तराफा आहे. त्यावरून ट्रकसुद्धा पलिकडे नेले जातात. पाणी इतके चढले की तराफा धोक्यात आला. पाणी वाढले म्हणून धक्का मागे नेण्यात आला पण इतक्यात पाणी इतके उतरले की धक्का परत खोल पाण्यापर्यंत वाढवावा लागला.

हे सर्व प्रकार पाहत आम्ही तिष्ठत होतो. "ते वाहत काय येताय रे!" प्राध्यापकांनी एकदम मला विचारले. हातातली दुर्बिण मी आळसटपणे डोळ्यांना लावली.

"माणूस! माणूस वहात येतोय!!" डोळ्यावरची दुर्बिण न काढताच मी ओरडलो. प्राध्यापकांनी दुर्बिण माझ्या हातातून हिसकावून घेतली. आमच्या शेजारी उभ्या असलेल्या एका पोऱ्याने तत्काळ धाव घेतली. माणूस वहात चाललाय ही बातमी वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली. दोन दिवसांपूर्वीच एका तरुण ट्रक-ड्रायव्हरला पोहतांना मृत्यू आला होता. पुष्कळ शोध करूनही त्याचा देह सापडला नव्हता. 'गेल्या पंधरवड्यातला हा दुसरा बळी.' एक एंजिनिअर म्हणाले.

गंडकी नदीच्या लहरीपणामुळे रामदीघाटला आम्हाला दोन दिवस थांबावे लागले. हा वेळ वाया मात्र गेला नाही. रामदीघाटच्या परिसरात शास्त्रीय माहिती भरपूर मिळाली. येथील एक्झिक्युटिव्ह एंजिनिअर श्री. जोशी यांच्या आदरातिथ्याचा लाभही भरगच्च मिळाला. तिसऱ्या दिवशी पोखऱ्याला जाणाऱ्या एका ट्रकमध्ये जोशींनी आमची सोय केली. सुनौली–पोखरा मार्गाने आमचा प्रवास सुरू झाला.

ट्रक वाहतूक सुरू असली तरी रस्त्याचे काम थांबलेले नव्हते. काही ठिकाणी प्रचंड शिळा अजूनही रस्ता अडवून उभ्या होत्या. सुरुंगाने त्यांना उडवून लावून मगच ट्रक पुढे नेता आला. एक-दोन ठिकाणी पावसामुळे दरडी कोसळल्या होत्या. तेथे रस्त्यातील दगड व माती बाजूला काढण्याचे काम चालू होते. सांडवे बांधून तयार नव्हते. अशा ठिकाणी रस्ता अगदी दरीच्या टोकावरून जाई. ह्या तुटक्या कड्यावरून ट्रकचे चाक जाऊ लागले की डोळे मिटून घ्यावेसे वाटत. ट्रक-ड्रायव्हरच्या कौशल्याची परीक्षा घेण्यासाठी तर रस्ता खुला केला नसेल ना! असा एक विचार मनात येऊन गेला. हे ड्रायव्हर लोक बाकी आहेत निष्णात. सगळे

शीख आणि सगळे तरुण. मृत्यूला पाठीशी घालून काम करणाऱ्या या सरदारजीं-बद्दल कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही.

रामदीघाटपासून काही मैलांवर आम्ही कृष्ण गंडकीचा निरोप घेतला आणि रस्त्याने आंधी खोल्याची (खोला म्हणजे प्रवाह) सोबत धरली. जवळचा रस्ता म्हणून ड्रायव्हरने या प्रवाहाच्या वाळवंटातूनच गाडी काढली. या प्रवाहाने निर्माण केलेल्या पसरट दरीत भाताची खाचरे विखुरली होती. किनाऱ्यावर आंबा, फणस, वड, पिंपळ यांची झाडे दिसत होती. गवताच्या छपरांची घरे आणि तांबडी माती. मला कोकणची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही.

रामदीघाटपासून ४८ मैलांवरील पुतलीखेत या गावी पोचण्यास आम्हाला सात


स्वातंत्र्यवीर सावरकरलिखित ग्रंथांच्या स्वस्त आवृत्त्या

✦ १५ जुलैस नोंदणी बंद होत आहे.

'१८५७ चे' स्वातंत्र्यसमर | काळे पाणी | सहा सोनेरी पाने

| '१८५७ चे' स्वातंत्र्यसमर | काळे पाणी | सहा सोनेरी पाने |
|---|---|---|
| मूळ मराठी प्रत | रोमांचक कादंबरी | भारताची विजय गाथा |
| मूळ किंमत १५ रुपये | मूळ किंमत १० रुपये | मूळ किंमत १५ रुपये |
| स्वस्त आवृत्तीची किं. रुपये ७-५० फक्त | स्वस्त आवृत्तीची किं. रुपये ५ फक्त | स्वस्त आवृत्तीची किं. रुपये ७-५० फक्त |

नोंदणी सुरू आहे. कोणतेही एक नोंदवू शकता.

तिन्ही एकाच वेळी नोंदविल्यास फक्त एकोणीस रुपयांत.

पुस्तक-विक्रेत्यांकडे अगर

**मॅजेस्टिक बुकस्टॉल**

* गिरगाव नाका, मुंबई ४. * शनिपाराजवळ, पुणे २.

तास लागले आणि त्यापुढे वीस मैल पोखरा गाठण्यास आणखी चार तास लागले. रस्त्याच्या स्वरूपाची यावरून कल्पना येईल.

## मुक्काम पोखरा

पोखरा एका विस्तीर्ण दरीत वसलेले आहे. काठमांडू ज्या दरीत वसले आहे ती सोडली तर एवढी प्रचंड दरी नेपाळमध्ये दुसरी नाही. सेती नदीच्या खोल पण प्रशस्त घळईंनी या दरीचा उत्तर व ईशान्य भाग व्यापला आहे. पूर्वेकडे मात्र ही घळई अगदी निरुंद व अतिशय खोल बनली आहे. काही ठिकाणी तर ती इतकी निरुंद आहे की या तीरावरून त्या तीरावर उडी मारता यावी. पण तिच्या तळाचा ठाव घेणे कठीण. वरून दगड टाकला तर तो आपटत किती तरी वेळाने खाली पाण्यात पडतो आणि पाण्यावर तो आपटला की पृथ्वीच्या गर्भातून यावा तसा ध्वनी येतो. या काळदरीत सूर्यप्रकाश काही फुटापर्यंतच पोचतो. पृष्ठभागापासून या घळईची खोली पाचशे फूट तरी असावी. दक्षिणेकडे मात्र ही दरी रुंदावते आणि आतापर्यंत गडप झालेल्या सेतीचे पुनश्च दर्शन घडते. जणू काही पाताळातूनच ती अवतीर्ण झाली आहे.

पोखऱ्याचा परिसर अतिशय रमणीय आहे. चौफेर पसरलेली हिरवीगार कुरणे-पश्चिमेकडे विशाल पेवा सरोवराचे गर्द निळे पाणी आणि उत्तर क्षितिज व्यापून टाकणाऱ्या हिमाच्छादित पर्वतराशी. धवलगिरी–२६,७९५ फूट, अन्नपूर्णा एक–२६,४९३ फूट आणि मच्छमुच्छरे–२३०९० फूट या काही सुप्रसिद्ध शिखरांचे दर्शन केवळ २००० फूट उंचीवरून येथे आपणास घेता येते. पोखऱ्याची समुद्रसपाटीपासून उंची दोन हजार फूट आहे तर दहा–बारा मैलांवरील मच्छमुच्छदे या शिखराची उंची २३,०९० फूट आहे. इतक्या कमी अंतरात पृष्ठभागाच्या उंचसखलपणात इतका प्रचंड फरक इतरत्र क्वचितच आढळून येईल. पेवा सरोवराच्या नितळ पाण्यात या उत्तुंग पर्वतांचे प्रतिबिंब पडलेले पाहवयास मिळणे यासारखे दृष्टिसुख नाही. सरोवरात एक छोटेसे बेट आहे अन् त्यावर एक पर्णराशीत लपलेले कालिमातेचे मंदिर आहे.

पोखऱ्याच्या पृथ्वीनारायण महाविद्यालयातील प्रा. त्रिपाठी यांच्यासाठी आम्ही ओळखपत्र बरोबर घतले होते. पुढील मार्गाची माहिती त्यांनी तत्परतेने पुरवली. आमच्याबरोबरचे जादा सामान वाहून नेण्यासाठी दोन हमालही ठरवून दिले. पूर्वीच्या मंत्रिमंडळातील रक्षा मंत्री श्री. मीनबहादूर गुरुंग यांनाही आम्ही भेटलो. त्यांच्याकडूनही आम्ही ओळखपत्रे घेतली. नेपाळमधील या प्रतिष्ठित व्यक्तींना आम्हाला भेटता आले ते गोरखपूर विद्यापीठातील भूगोलाचे प्राध्यापक डॉ. महात्मासिंग यांच्या शिफारशीमुळेच.

"तुम्ही लोक चालणारे पक्के असाल तर पाच दिवसात सहज मुक्तिनाथला पोचाल," त्रिपाठी आश्वासित होते. "आमचे लोक चार दिवसात सहज जातात"

"पण आमच्या प्रत्येकाच्या पाठीतर पंधरा किलो ओझं आहे"–मी.

"एवढं सामान उगीच घेतलत. वाटेत सर्व मिळतं. जेवण, अंथरुण–पांघरूण सर्व काही. शिवाय वाटेत तुम्हांला काही सामान ठेवून पुढं जावंसं वाटलं तरी हरकत नाही. तुमच्या कोणत्याही वस्तूला हात लागायचा नाही."

"परत येताना वापरायच्या फूड–पॅक्स वाटेतच आपण ठेवू" प्राध्यापकांची सूचना.

- "सिगरेटस वगैरे बरोबर ठेवा. विशेषतः टुकुचाच्या आसपास खम्पे भेटतील. त्यांनी सिगरेट, बाटली वगैरे मागितली तर जवळ असावी. त्यांचं माथं केव्हा भडकेल याचा नेम नाही." त्रिपाठींनी इशारा दिला.

"जोमसोमच्या पुढे जाऊ देतात का ?" बडव्यांनी विचारलं.

"परदेशीयांना नाही जाऊ देत. पण भारतीयांना त्यातून तुम्ही मुक्तिनाथला, हृदू तीर्थक्षेत्राला जात आहात. मला नाही वाटत तुम्हांला कोणी अडवेल."

"वर्तमानपत्रांची रद्दी मिळेल की नाही ? नाही तर वनस्पती गोळा केल्यावर त्या 'प्रेस' कशा करायच्या हा प्रॉब्लेमच आहे !" वर्तकानी शंका व्यक्त केली.

"मोठ्या गावातून बहुतेक मिळेल. इथून घेऊन जावी हे बरं आणि .... परत येताना बागलुंगकडून या. रस्ता कठीण आहे, पण पाहण्यासारखा आहे. विशेषतः गंडकीच्या घळईचं खरं रौद्र स्वरूप तिथंच पाहायला मिळतं."

इशारे, सूचना, सदिच्छा यांच्यासह २४ मे रोजी सकाळी सहा वाजता आम्ही पोखरा सोडलं. भल्या पहाटे म्हणता येणार नाही, कारण इथं चारलाच चक्क उजाडतं. हवा स्वच्छ होती. मच्छमुच्छरेच्या प्रचंड सुळक्यावर उन्हं पडून पडून तो लकाकत होता. वायव्येकडे दूरवर धवलगिरी अस्पष्ट दिसत होता. अन्नपूर्णच्या सव्वीस हजार फूट उंचीने उत्तर क्षितिजाचा बराचसा भाग व्यापला होता. या दोन गिरीराजांच्या मधूनच आम्हांला मार्ग काढायचा होता. पाठीवरच्या रकसॅकस् सावरीत पश्चिम दिशेकडे आम्ही कूच केले.

"वेअर आर् यू गो ऽ इंग ?"

आम्ही चमकून वर बघितलं. यांगनेवाशी गावात नुकतेच आम्ही शिरलो होतो. रस्त्यालगतच्या एका दुमजली घराच्या खिडकीतून एक गोरा तरुण डोकावत होता.

"टु मुक्तिनाथ." आमच्यापैकी कोणीतरी म्हणालं.

"ओ ऽ ! वुइ कॅन्ट गो देअर–अमेरिकन्स आ ऽ ऽ नॉट परमिटेड."

"देन यू बी ॲन इंडियन नॅशनल." वर्तकांनी सुचविलं.

"तो हसला. अमेरिकन शांतीसेनेचे हे "शांतीदूत" नेपाळमध्ये खेडोपाडी पसरलेले आहेत.

पोखऱ्याचा रम्य परिसर मागे टाकून आम्ही एका लांबलचक, रेताड दरीत प्रवेश केला. हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच झाडे दिसत होती–वड आणि पिंपळ जोडीने. त्या भोवती पार बांधलेले. हे वृक्ष म्हणजे भैरव आणि विष्णू–नेपाळ-

मधील दोन प्रिय दैवते–यांची निवासस्थाने. म्हणून जोडीने लावलेले.

तीन–चार मैलांचा दरीतला तो कंटाळवाणा रस्ता मागे टाकून आम्ही चढाला लागलो आणि हजार फूट चढून डोंगरमाथ्यावरील नौदांडा गावात दुपारच्या विश्रांतीसाठी एका घरात थांबलो. प्रवाशांना उतरण्यासाठी ज्या घरात सोय असते, त्याला म्हणतात भट्टी. भट्टीवालीकडून तुम्ही जेवण घ्यावे, ही तिची अपेक्षा. मग राहण्यासाठी, आंथरुण–पांघरुणासाठी पैसे कोणी घेत नाही. आमच्याजवळ खाण्याचे जिन्नस होतेच. पण रीत म्हणून चहा, भाजी, डाळ (आमटी) वगैरे आम्ही भट्टी-वालीकडून घेतलं. शिवाय हमालांना जेवण द्यायचं होतंच. जेवणाचा थाट और होता. बसायला लोकरीचा सुंदर गालिचा, स्टेनलेसस्टीलची चकचकीत ताटं–वाट्या घर स्वच्छ, सारवलेलं. झोपायला चारपाई, त्यावर स्वच्छ ब्लँकेट. श्रमपरिहारा-साठी आणखी काय पाहिजे ?

दुपारी तीन वाजता आम्ही पुढे निघालो. एव्हाना गावातील लोकांचे कुतूहल पुरेसे जागृत झाले होते.

"कहाँ जाओगे ?" एकाने धिटाईने विचारलं.

"मुक्तिनाथ !"

"घर कहाँ !"

"बम्बई !" पुणे म्हटलं तर कदाचित समजणार नाही, या अंदाजानं आम्ही सांगितलं.

हा संवाद पुढे शंभरदा तरी उच्चारला जाणार होता.

रस्ता डोंगराच्या शेंड्यावरून जात होता. डोंगरमाथ्यावर ठिकठिकाणी छोटे तलाव बांधलेले होते, पावसाळ्यात पाणी साचविण्यासाठी. आता मात्र ते कोरडे ठणठणीत होते. मधूनच एखाद्या टेकडीच्या माथ्यावर शिवाचे मंदिर लागे– अगदी आपल्याकडील डोंगरांप्रमाणे. एखादा भव्य वटवृक्ष मधूनच आपली छाया पसरूत उभा राहिलेला आढळे. बाकी डोंगर बोडकेच. उतारांवर जमीन सपाट करून भाताची खाचरे तयार केलेली. नेपाळमध्ये ठिकठिकाणी अनिर्बंध जंगलतोड चाललेली आहे, याचे हे उदाहरण.

"आज बिरेथाटीला मुक्काम झाला पाहिजे" मी म्हटलं. त्रिपाठींनी तर बिरे-थाटीच्या पुढे जायला सांगितलं होतं. त्यांनी म्हटल्यापेक्षा आपली चाल कमी पडणार अशी चुटपूट माझ्या मनाला लागली होती.

"बिरेथाटी अब कितना दूर है ?" एका वाटसरूला बडव्यांनी विचारलं.

"तीन कोस !"

"बहोत दूर है साहब ।" आमचा हमाल गंगबहादूरने पुस्ती जोडली.

"कितना घंटा लगेगा ?" – बडवे.

[ पान ५० वर पाहा

चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशित

पुणे

# आस्वाद

"Each soul is potentially divine.

The goal is to manifest this divinity within, by controlling nature, external and internal.

Do this either by work, worship, or psychic control, or philosophy–by one, or more, or all of these–and be free.

This is the whole of religion. Doctrines, or dogmas, or rituals, or books, or temples, or forms are but secondary details."

—Swami Vivekananda.

विश्वव्यापी धर्माचा जीवनभर उपदेश करणाऱ्या स्वामी विवेकानंदांच्या जीवितकार्याचे सूत्रच वरील छोटया उपदेशपर परिच्छदात आलेले आहे.

प्रत्येक आत्मा हा मूलतः शुद्ध स्वरूपात दैवीच आहे अशी स्वामीजींची श्रद्धा होती. पहिल्याच वाक्यात त्यांनी तसे ठासून सांगितलेले आहे. अद्वत तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मा आणि परमात्मा यांच्यामध्ये मठावकाश आणि घटावकाश यांचे नाते आहे. जे आकाश, जी हवा, बाहेर सर्वत्र पसरलेली आहे तीच एखाद्या घटामध्ये असते. केवळ घटाच्या आकारामुळे तिला दृश्य आणि निश्चित आकार आलेला असतो. ती बंदिस्त झालेली असते. त्याचप्रमाणे जीवाच्या जड शरीरात आकारलिप्त झालेला परमात्मा म्हणजे त्या जीवाचा आत्मा होय. प्रत्येक आत्मा परमात्म्याचा अंश आहे. स्वामी विवेकानंदांनी स्पष्टपणे केलेल्या विधानामागे हे अद्वैत तत्त्वज्ञान आहे.

तथापि, केवळ या अद्वैताच्या जाणीवेने समाधान होण्यासारखे नाही. विवेकानंदांचे पुढचे वाक्य त्या दृष्टीने जास्त महत्त्वाचे आहे. आत्म्याचे हे दैवीपण, ही त्याची शक्ती संशयरहिततेने स्पष्ट करणे अगत्याचे आहे. किंबहुना जीवाचे ते ध्येय (goal) आहे असे स्वामीजी म्हणतात. आणि हे ध्येय साध्य कर-

ण्याची दिशाही त्यांनी सांगितलेली आहे. by controlling nature, external and internal ! प्रकृतीवर ताबा मिळवून, तिचे नियमन करून, बाह्य आणि आंतर अशा दोन्ही क्षेत्रांत तिच्यावर स्वामित्व प्रस्थापित करूनच आत्म्याचे हे परमात्म्याशी असलेले अभिन्नत्व सिद्ध करावे लागेल. मायच्या आश्रयाने उभारले गेलेले सर्व इंद्रियगम्य जग हे प्रकृतीचे बाह्य रूप, तर मन, बुद्धी आणि अहंकार यांच्यासहित सर्व इंद्रियव्यापार हे तिचे आंतर रूप. या सर्वांवर नियमन केल्या-वाचून त्यांचे वैय्यर्थ्य आणि पर्यायाने अभिन्नत्व सिद्ध होणार नाही. बाह्य सृष्टि-व्यापाराच्या मायिक रूपाची मनोमन ओळख पटली, त्यानुसार प्रथम कर्मेंद्रियांचे आणि नंतर ज्ञानेंद्रियांचे नियमन करता आले, पर्यायाने मन काबूत राहून बुद्धी शुद्ध झाली व अहंकार नष्ट झाला म्हणजे आत्म्याला त्याचे खरे दिव्य (divine) स्वरूप प्राप्त होईल. स्वामीजींच्या एका साध्या वाक्यामागे एवढी प्रक्रिया अनुस्यूत आहे.

अर्थात प्रकृतीचे हे नियमन कोणत्याही उपायाने करता येईल. त्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ भाग नाही. कर्मयोगाने (work) हे साध्य होईल. भक्तीने ते गवसू शकेल, मनोनिग्रह करून हठयोगाच्या साहाय्याने ते प्राप्त करून घेता येईल, किंवा तत्त्व-ज्ञानाच्या अभ्यासाने, ज्ञानयोगानेही ते मिळविता येईल. सर्व कर्मांचा फलाशारहित विनियोग करून कर्मयोगी प्रकृतीचे नियमन करून शकतो. ईश्वराची अनन्यभावे भक्ती करून भक्तिमार्गी प्रकृतीला जिंकू शकतो. हठयोगी मनोनिग्रह करून शरीर, आत्मा आणि परमात्मा यांचे संमीलन घडवून आणतो, तर तत्त्वज्ञानी केवळ ज्ञानाच्या प्रखर प्रकाशाने प्रकृतीची उपाधी नष्ट करून आत्म्याचे दिव्यत्व प्रज्वलित करतो. यापैकी एक, किंवा अधिक किंवा सर्व मार्ग वापरले तरी अंतिम उद्दिष्ट एकच आहे. आत्म्याचे दिव्यत्व सिद्ध करून मुक्तीचे पद मिळविणे यापैकी कुठल्याही मार्गाने ते निश्चित मिळेल असा विवेकानंदांचा विश्वास आहे.

आणि कुठल्याही धर्माचा गाभा हाच आहे. यापेक्षा वेगळे असे धर्मामध्ये काहीही नाही. धर्मतत्त्वे, तत्त्वप्रणाली, संस्कारशास्त्र, धर्मग्रंथ, मंदिरे अथवा देवता ह्या गौण आहेत. तो तपशिलाचा भाग आहे. मूळ तत्त्व एकच. त्यासाठी प्रकृतीचे बाह्य व आंतर नियमन करणे हा मार्ग.

चारच वाक्यांमध्ये स्वामी विवेकानंदांनी केवढेतरी विशाल तत्त्वसार सांगितले आहे. आत्म्याचे दिव्यत्व, प्रकृतीचे नियमन, त्यासाठी प्रचलित असणारे भिन्न मार्ग आणि त्यांचे अभिन्नत्व या साऱ्या सत्यांना येथे स्पर्श केला गेला आहे. जो विश्व-व्यापी धर्म स्वामीजींना जगात निर्माण करावयाचा होता त्याचा पायाच हा नव्हे काय ? पुन्हा ते साध्या, सरळ, सर्वांना समजेल अशा परंतु खंबीर आत्मविश्वासपूर्ण शब्दांत सांगितले आहे हे विशेष. सामान्यांना प्रेरणा देण्याचे सामर्थ्य अशा शब्दांत असते.

—रसिक

# हिरा

# जो भंगला नाही

राजे महाराजांचे सत्तेचे आणि वैभवाचे दिवस केव्हाच संपले. परवा तर एका पिढीजाद राजाने आपली बिरुदे लिलावात विकून, येणाऱ्या रकमेतले अर्धे तुम्ही घ्या पण अर्धे मला द्या अशी सूचना भारत सरकारला केल्याचे प्रसिद्ध झाले. परंतु वैभव गेले तरी एके काळच्या या कर्तुमकर्तुम्, लाडावल्या जमातीविषयीचे सार्वत्रिक कुतूहल संपलेले नाही. ही उंची बेकार मंडळी आज कशी जगतात याविषयीच्या सत्य, अर्धसत्य आणि काल्पनिक हकीकतींबद्दलची तुमची–माझी उत्सुकता आजही कायम आहे.

निदान तशी ती असेल अशा विश्वासाने मुंबईच्या विलेपार्ले म्युझिक सर्कल या संगीत-प्रधान संस्थेने नुकतेच एक गद्य नाटक रंगभूमीवर आणले; त्याचे नाव–' हिरा, जो भंगला नाही. ' कर्त्या सौ. मालती बेडेकर.

' ॲनास्टाशिया ' या फ्रेंच नाटकाच्या आधारे हे मराठी नाटक बेडेकरबाईंनी लिहिले आहे. मूळ नाटकातली रशियाच्या पदच्युत सम्राट झारची देशोधडी लागलेली कन्या ॲनास्टाशिया मराठी रूपांतरात हैद्राबादलगतच्या साकीना नामक काल्पनिक खालसा संस्थानची राजकन्या नंदिनी बनली आहे. हैद्राबादवरील पोलिस–चढाईच्या वेळी या छोटया संस्थानची वाताहत होते आणि अल्पवयीन राजकन्येच्या परवडीला आरंभ होतो. सामान्य स्त्रीलाही जगणे अशक्य असे एक भयाण जिणे तिला जगावे लागते

रा त रा णी — वि ज य तें डु ल क र



मोहन दळी व सौ. इंदूमती पेंगणकर

आणि अखेर पवईच्या तलावात आत्महत्यसाठी तिने उडी घेतली असता साकीना संस्थानशीच पूर्वी शरीरसंरक्षकाच्या चाकरीने निगडीत असा दुष्ट, स्त्रीलंपट, निमकहराम, कातडीबचाऊ त्र्यंबकजी तिला वाचवतो, बंगल्यावर घेऊन येतो. हे तो करतो तेव्हा त्याला कल्पनाही नसते, की जीवनाला विटलेली, उपाशी, अशक्त, वेडसर अशी ही घाणेरडी तरुण स्त्री साक्षात राजकन्या नंदिनीच असेल ! कारण नंदिनीच्याच शोधात तो कसून असतो. संस्थानची युरोपमधल्या एका बँकेत पडून असलेली फार मोठी मालमत्ता ताब्यात यावी या जबर महत्त्वाकांक्षेने पेटलेला त्र्यंबकजी या बेवारशी, भणंग पोरीलाच नंदिनी म्हणून तयार करण्याचा घाट घालतो. तिला पढवतो, तिच्या तालमी घेतो. अंगच्या राजबिंडया तेजस्वीपणे ती अस्सल राजकन्येसारखी वागू लागली की तिला टोचून, बोचून, छळून पुन्हा मूळ पदाची जाणीव देतो. नंतरच्या घटनात नंदिनी खरी राजकन्या असल्याचा संशय यावा, तो बळावावा असे तपशील त्र्यंबकजी आणि त्याच्या साथीदारांना मिळत जातात. तरीही त्यांचा संभ्रम संपत नाही. मात्र नंदिनीची 'आजी—मा' दुर्गामाता नातीच्या अस्सलपणाविषयी स्वतःची निखालस खात्री पटवून घेते. त्र्यंबकजीच्या दृष्टीने बेवारशी पण दुर्गामाताच्या दृष्टीने खरोखरी राजकन्या अशा नंदिनीच्या कामचलाऊ राज्यारोहण समारंभाचा बनाव त्र्यंबकजी आणि त्याचे साथीदार घडवून आणणार असता नंदिनी संस्थानचे मातृभूमीच्या

सेवेचे, बहुजनहिताचे ब्रीद खरे करण्यासाठी तकलादू राणीच्या बंदिवान आयुष्या-सहित राजवस्त्रे मागे ठेवून एक मामुली स्त्री म्हणून उघड्या जगात निघून जाते. धूर्त आणि महत्त्वाकांक्षी त्र्यंबकजी हात चोळीत राहतो.

## दोन उपकथा

या मुख्य कथेत दोन उपकथाभाग निसटतेच येऊन जातात. एक : नंदिनीच्या मामुली स्त्री म्हणून जगलेल्या आयुष्यात येऊन गेलेल्या डॉ. भास्कर याच्याबरोबरच्या तिच्या संबंधाचा एक भाग. हा डॉ. भास्कर राजकन्या नंदिनीच्या बंदिवान आयुष्यात घुसून तिचे ते सामान्य पण सुखाचे जुने आयुष्य जागे करण्याची पराकाष्ठा, त्र्यंबकजीचा विरोध पत्करूनही करतो. तो नंदिनीला तिच्या त्या सामान्य आयुष्याकडे त्र्यंबकजीच्या कैचीतून काढून नेऊ मागतो, परंतु नंदिनी जाणे नाकारते. (नंतर शेवटी ती जाते ती स्वेच्छेने, एका अपरिहार्यपणे.) दुसरा विक्रमसिंह म्हणून राजघराण्यातला एक समवयस्क पुरुष नंदिनीच्या पूर्वस्मृती जाग्या करण्याचे प्रयत्न जाणता-अजाणता करतो. दोघांचे लग्न पुढे होणार असा दोघांच्याही बालपणी एक समज होता. दुर्गामाता याचे स्मरण नंदिनीला सहजपणे करून देते आणि नंदिनीचे आणखी एक भावविश्व ओझरते चाळवते. मात्र ही दोनही पूर्वायुष्ये नंदिनीशी प्रत्यक्षपणे निगडित असूनदेखील बेडेकरबाईंच्या नाटकात मुख्य कथाभागात विशेष भर घालीत नाहीत. त्यांचे रंग फिके आणि ओझरतेच राहिले आहेत. प्राधान्य येते ते नंदिनी–त्र्यंबकजी–दुर्गामाता या त्रयीला. त्या खालोखाल त्र्यंबकजींच्या सेतुमाधवादी साथीदारांना. त्र्यंबकजी आणि हे दोघे मिळून साकीना संस्थानच्या हलक्या अंगाचे चित्र आपल्या इरसाल वागण्या–बोलण्यातून उभे करतात. उरलेले वजनदार, पीळदार आणि भारदस्त चित्र दुर्गामाता या राजघराण्यातल्या वृद्धेच्या रूपाने साकार होते. या दोन चित्रांच्या मधोमध, जिचा भूतकाळ पुसटलेला, ओरबाडला गेलेला आहे, अशी नंदिनी या नाटकात एका निरागसपणे पण उत्तरोत्तर धिटाईने आणि हिशेबाने वावरते. दुर्गामातेविषयीची अपार ओढ आणि त्र्यंबकजी आणि त्याच्या टोळक्याविषयीची घृणा–दोन्हींपासून अलिप्त होऊन ती अखेर जाते.

हे झाले लिखित नाटकाबद्दल. या भागात संस्थाने, सत्ताधारी अशा विविध विषयांवर हलके–भारी प्रहार करणारे, खोचक–बोचक चमकदार संवाद प्रकर्षाने लिहिले गेले आहेत. त्या मानाने नंदिनीच्या भावविश्वाचे दर्शन संवादांतून कमी घडते. तिची शोकात्मिका जाणवते, ती तिच्या शब्दांपेक्षा तिच्या भूतकाळाच्या तपशिलातून; किंवा दुष्ट त्र्यंबकजीकडून घडणाऱ्या तिच्या छळातून आणि अवहेलनेतून.

प्रत्यक्ष प्रयोगात–हा विश्राम बेडेकर यांनी दिग्दर्शित केला आहे–ओरबाडल्या, पुसटल्या भूतकाळाची निरागस नंदिनी इंदुमती पैंगणकर यांनी आपल्या कोमल व्यक्तिमत्त्वाने बरीच चांगली उभी केली. त्या मानाने पुढल्या हिशेबी आणि धिटाईच्या भागात त्या दिसल्या देखण्या; पण अभिप्रेत त्या अनेक रंगी (complex)

अभिनयात कमी भासल्या, फार सरळ वाटल्या. तरीही लिखित नाटकाचा हा महत्त्वाचा मध्यभाग–नायिका–त्यांनी पुष्कळच चांगला उभा ठेवला.

त्र्यंबकजी आणि त्याच्या साथीदारांपैकी खुद्द त्र्यंबकजी सतीश दुभाषी यांनी साजेशा सफाईदार ठगेपणाने वठविला. परंतु त्र्यंबकजी एवढाच नाही, तो फार पाताळयंत्री, नीच आणि अफाट महत्त्वाकांक्षी जिगरबहाद्दर आहे. महत्त्वाकांक्षेसाठी तो कोठचीही परिसीमा गाठेल. त्र्यंबकजीचा हा भाग दुभाषींच्या त्र्यंबकजीमध्ये कमी उतरला. तो सामाजिक नाटकातला फार फार तर दोन-चार तरुण पोरींना फसवणारा पांढरपेशा खलनायक भासला. त्याची खटपट जाणवली, अफाट जिगर जाणवली नाही. कारस्थान पटले, पाताळयंत्री नीच मेंदूची खातरजमा झाली नाही. दुष्टावा कळला, पण विकृत (Sadist) दुष्टाव्याची हद्द त्याने गाठली नाही. शिवाय दुभाषी तंटचा भिल्लासारख्या दाढीमिशा लावूनही चेहऱ्याने पंचविशीतले वाटत होते. त्यांच्या उरल्या चेहऱ्यावर भूमिकेच्या अंगाने काही आवश्यक रंगकाम राहून गेले असे वाटत राहिले. त्र्यंबकजीचे अन्य दोन साथीदार (जयंत सावरकर, नंदा फडके पुरेसे इरसाल आणि चिल्लर वाटले.)

दुर्गामाता म्हणून सुमती गुप्ते (जोगळेकर) शंभर टक्के राजबिंडी वृद्ध स्त्री दिसल्या, पण अभिनयात–विशेषत: वाणीत–भूमिकेला जरूर ते वजन आणि प्रखरता त्यांना भरता आली नाही. त्र्यंबकजीप्रमाणे यांनाही एक जोड होती; पण ती जवळपास शोभेची (सौ. देशपांडे).

नंदिनी ज्या कथाभागात मध्यभागी उभी होती त्याच्या दोन अंगांची रंगमंचावरची ही हालहवाल. याने संपूर्ण नाटकाला कथानकप्रधान रहस्य-उत्कंठायुक्त नाटकाचे स्वरूप आले आणि उत्कट भाव-नाटच, तसेच नाटचवस्तूची मूलभूत भव्यता ही दोन अंगे कमजास्त उणी राहून गेली. याचे श्रेय काही अंशी अर्थातच लेखनाकडे असले (मूळ नाटक आणि मराठी रूपांतरातील फरक) तरी प्रयोगाचा वाटाही थोडका नव्हता. प्रयोगाचा कलअभावितपणे असेल– भाव-नाटचापेक्षा ते फुलवण्यासाठी वेदना निर्माण करण्याचे काम वाटचास आलेल्या त्र्यंबकजी आणि त्याच्या साथीदारांकडे वाटत होता. त्र्यंबकजीच्याच भूमिकेतून जणू दिग्दर्शकाने नंदिनी, डॉ. भास्कर, विक्रमसिंह, दुर्गामाता यांचा विचार केला असावा तशा या व्यक्तिरेखा कमजास्त शोभेच्या, दुबळ्या आणि साधनवजा वाटत राहिल्या. ज्याला स्वत:चे असे परिपूर्ण, रसरशीत, मातबर व्यक्तिमत्त्व आहे असा सातत्याने भासला फक्त त्र्यंबकजी, या नाटकातला खलपुरुष.

पार्श्वसंगीत अनावश्यक होते. पांडुरंग कोठारे यांचे नेपथ्य देखणे–वजनदार, संस्थानी वातावरण उभे करू शकले. नाटकातल्या विविध ' मूड्स 'शी मात्र ते फटकून राहिले.

असा हा हिरा–जो भंगला नाही. ○

## वा. दा. रानडे

# वेड्यांच्या इस्पितळातली संख्या कैद्यांच्या चौपट आहे

सिनेटर रॉबर्ट केनेडी यांच्या भीषण खुनानंतर अमेरिकेतील हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी अध्यक्ष जॉन्सन यांनी एक कमिशन नेमल्याची घोषणा केली. हे कमिशन काय निष्कर्ष काढील व उपाय सुचवील ते सुचवो. पण जगातील सर्व-सामान्य माणसाची प्रतिक्रिया अशी आहे की अमेरिकेसारख्या संपन्न व पुढारलेल्या राष्ट्रात राजकीय खुनांनी प्रश्न सोडविले जात असतील तर त्या राष्ट्राला पुढार-लेले, सुसंस्कृत, लोकशाहीनिष्ठ राष्ट्र का म्हणावयाचे ? ही खुनी प्रवृत्ती का व कशी बळावली ? तिचा उगम कशात आहे ? तिला आळा घालण्यासाठी आतापर्यंत काही परिणामकारक प्रयत्न झाले का ? झाले असल्यास ते यशस्वी का झाले नाहीत ? या प्रश्नांचा विचार येथे करावयाचा आहे.

राजकीय खुनांची परंपरा अमेरिकेत काही अगदी अलीकडची नसून अब्राहाम लिंकन यांच्या खुनापासून (१८६५) ती चालत आलेली आहे. लिंकननंतर जेम्स ए. गारफील्ड (१८८१), विल्यम मॅक्किन्ले (१९१०) व जॉन केनेडी (१९६३) या तीन अध्यक्षांचे खून झाले. याशिवाय काही अध्यक्षीय उमेदवारांच्या खुनाचा प्रयत्न झाला. थिओडोर रूझवेल्ट १९१२ साली अशा हल्ल्यातून बचावले. फ्रँकलिन डी. रूझवेल्ट यांनी अध्यक्षपदाची सूत्रे १९३३ मध्ये प्रथम हाती घेण्याच्या एक महिना आधी, मायामी येथे त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली होती. पण नेम हुकला. ट्रूमन यांच्यावरही १९५० मध्ये गोळी झाडण्याचा प्रयत्न झाला. राजकीय नेत्यांच्या खुनाचे किंवा खून प्रयत्नांचे एवढे मोठे प्रमाण जगातील दुसऱ्या कोण-त्याही लोकशाही देशात आढळणार नाही.

### पुरोगामी नेत्यांचेच खून का ?

हे खून केवळ वैयक्तिक स्वरूपाचे होते की त्यामागे काही निश्चित धोरण दिसते ? पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे खून झालेले नेते उदारमतवादी व पुरो-

# ? अमेरिकेतील हिंसाचार ?

गामी विचारांचे होते. उजव्या गटाच्या नेत्यांपैकी कोणाचा खून झालेला आढळत नाही. गेल्या पाच वर्षांत अध्यक्ष जॉन केनेडी, मेडगर एव्हर्स, माल्कम एक्स, मार्टिन ल्यूथर किंग आणि रॉबर्ट केनेडी या पाच नेत्यांचे खून झाले. या पाचपैकी चार खून उजव्या गटाचे वर्चस्व असलेल्या भागात झालेले आहेत. अध्यक्ष केनेडींचा डलसमध्ये, मार्टिन ल्यूथर किंग यांचा टेनेसीमध्ये, मेडगर एव्हर्स यांचा मिसिसिपी-मध्ये आणि रॉबर्ट केनेडींचा लॉस एंजीलीसमध्ये खून झाला. विशिष्ट भागात आणि विशिष्ट विचारसरणीच्या नेत्यांचेच खून व्हावेत हा काही केवळ योगा-योग नव्हे.

अमेरिकेतील उजवा गट एवढा कट्टर आहे की ब्रिटनमधील हुजूर पक्षाचे नेते हीथ सुद्धा त्यांना 'डावे' वाटतात. समाजापुढील प्रश्न डोक्याला त्रास न देता साध्या सोप्या उपायांनी सोडवावयाचे अशी या गटाची विचारसरणी आहे. अण्व-स्त्रांचा वापर करून व्हिएटनाम युद्ध संपवा. विद्यार्थ्यांतील असंतोष थांबवायचा असेल तर विद्यार्थ्यांच्या अनुदानात कपात करा, दंगे थांबविण्यासाठी अधिक पोलिसांचा वापर करा आणि खून थांबविण्यासाठी देहान्ताची शिक्षा अधिक प्रमाणात द्या असे त्यांचे साधे उपाय आहेत. खून हा त्यापैकी सर्वांत साधा व सोपा उपाय.

राजकीय खुनांशिवाय इतर खूनही अमेरिकेत मोठ्या प्रमाणात घडत असतात. त्यांना काही विशेष गंभीर कारणही लागत नाही.

☐ वॉशिंग्टनमध्ये टॉमी विल्यम्स या विद्यार्थ्याचा खून झाला. हायस्कूल परी-क्षेस तो बसला होता व पुढच्याच आठवड्यात त्याचा निकाल होता. काही मित्रां-बरोबर तो वॉशिंग्टनला आला. त्यांच्यात भांडण झाले. हे भांडण सोडविण्याचा सोपा उपाय म्हणून दोन्ही गटांना न ओळखणाऱ्या एका तिसऱ्याच इसमाने चार गोळ्या झाडून विल्यम्सला ठार केले.

☐ शेजाऱ्याचा कुत्रा फार त्रास देतो म्हणून एका इसमाने त्यास गोळी घालून ठार केले.

☐ शेजाऱ्याचा मुलगा फार गडबड गोंगाट करतो म्हणून एकाने त्या मुलास गोळी घातली.

## अर्ध्या तासास एक खून

गेल्या वर्षी अमेरिकेत ५६०० लोक बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडले. व्हिएटनाम युद्धात दरवर्षी जेवढे अमेरिकन ठार होतात त्यापेक्षा अधिक स्वदेशातच बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडतात. दिवसाला पन्नास म्हणजे दर अर्ध्या तासाला एक खून पडतो. ब्रिटन, फ्रान्स व बेल्जियम या तीन देशांत मिळून गेल्या वर्षी फक्त ७० खून झाले. अमेरिकेतील खुनांचे प्रमाण याच्या ८० पट आहे. अध्यक्ष केनेडींचे खुनानंतर अध्यक्षास खुनाची धमकी दिल्याबद्दल अटक झालेल्यांची संख्या पाच पटीने वाढली. गेल्या वर्षी ती ४२५ होती.

वर्णीय पक्षपात नाहीसा करण्याच्या उद्देशाने गोरे व निग्रो यांच्या संमिश्र शाळा अमेरिकेत काढण्यात आल्या. पण निग्रोंना मिळणारी अवहेलनेची वागणूक अजूनही थांबलेली नाही. त्यामुळे त्यांच्यांत गोऱ्यांविषयी द्वेष वाढत आहे. एका सामाजिक कार्यकर्त्याने एका संमिश्र शाळेला भेट दिली. " आम्ही गुलाम आहोत. " असे निग्रो-मुले त्याला ओरडून सांगत होती. " गोऱ्या इसमास ठार करणे मला आवडेल, " असे एक निग्रो मुलगा गोऱ्या मुलास म्हणत होता असे या कार्यकर्त्यास दिसून आले.

अमेरिकेतील वाढत्या हिंसाचाराचे एक प्रमुख कारण म्हणजे पिस्तुले सहज उपलब्ध होतात. पोस्टाने एखादी वस्तू मागवावी तितक्या सहजपणे मागणी करून पोस्टाने पिस्तूल मागविता येते. अध्यक्ष केनेडींचा बळी घेणारे पिस्तूल असेच पोस्टाने मागविलेले होते. अमेरिकनांजवळ सध्या वीस कोट खाजगी पिस्तुले आहेत. म्हणजे दर माणसास एक पिस्तूल देता येईल, एवढी ही संख्या आहे. पिस्तुलास परवाना लागत नाही. त्याची नोंद करावी लागत नाही. दुकानातील कौंटरवर पिस्तूल अगदी सहज खरेदी करता येते.

अध्यक्ष केनेडींच्या खुनानंतर पिस्तूल-नियंत्रण करण्याचा कायदा करण्याची मागणी झाली. अध्यक्ष जॉन्सन यांनी काँग्रेसकडे बिल पाठविले. पण गेली चार वर्षे काँग्रेसच्या दोन्ही गृहांत ते रेंगाळत पडले होते. अखेर ते पास होण्यासाठी दुसऱ्या केनेडींचा खून व्हावा लागला. हे बिल पास झाले तेही मूळच्या स्वरूपात नव्हे तर त्यातील तरतुदी बऱ्याच पातळ होऊन. या बिलाने एका राज्यातून दुसऱ्या राज्यात फक्त पोस्टाने पिस्तुले मागविण्यास बंदी करण्यात आली आहे. पिस्तुलासाठी परवाना घेतला पाहिजे, त्याची नोंद केली पाहिजे, या सूचना मान्य झालेल्या नाहीत.

ओरेगॉनमध्ये रॉबर्ट केनेडी प्रचार मोहिमेवर असता पिस्तूल-नियंत्रण कायद्याला तुम्ही का पाठिंबा देता असा प्रश्न श्रोत्यांच्या एका गटाने त्यांना विचारला होता.

या बिलाविरुद्ध साक्ष देण्यासाठी २५०० मैलांचा मोटारप्रवास करून तीन अमेरिकन आरिझोनाहून वॉशिंग्टनला आले होते. या बिलामागे कम्युनिस्टांचा कट आहे. आमची शस्त्रे काढून घेतल्यावर अराजक निर्माण होऊन कम्युनिस्टांना सत्ता हाती घेण्यास मदत होईल असा त्यांचा युक्तिवाद होता.

## गुन्हेगाराला अधिक स्वातंत्र्य

पिस्तुलाच्या सढळ वापराइतकेच वाढत्या गुन्हेगारीचे व खुनांचे दुसरे कारण म्हणजे अमेरिकेत गुन्हेगाराला असलेले स्वातंत्र्य. कायदा पालन करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांपेक्षा आज अमेरिकेत गुन्हेगाराला अधिक स्वातंत्र्य आहे. सुप्रीम कोर्टाचे काही निर्णय कायद्याच्या काटेकोर अर्थाने बरोबर असतील, पण त्यामुळे प्रत्यक्षात न्यायाचा तराजू गुन्हेगाराच्या बाजूने झुकला अशी टीका अनेक सिनेट सभासदांनी केली आहे. आरोपीने स्वखुषीने दिलेला कबुलीजबाब पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही असा निर्णय सुप्रीम कोर्टाने काही वर्षांपूर्वी एका खटल्यात दिला. अटक आणि आरोपपत्र ठेवणे यांत वाजवीपेक्षा जास्त काळ लोटला असेल आणि त्या काळात आरोपीचा कबुलीजबाब घेण्यात आला असेल, तर तो ग्राह्य मानू नये असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दुसऱ्या एका खटल्यात दिला. ओळख परेडच्या वेळी आरोपीचा वकील हजर नसेल तर पुराव्यात ती ग्राह्य मानू नये, असा तिसरा महत्त्वाचा निर्णय सुप्रीम कोर्टाने आणखी एका खटल्यात दिला. खून, दरोडा, बलात्कार हे गुन्हे केल्याची स्वतः कबुली देणारे व ज्यांच्या गुन्ह्याबद्दल शंका नव्हती असे गुन्हेगारही या तांत्रिक कारणांचा आधार घेऊन सुटले. आल्स्टन नावाच्या एका आरोपीस खुनाबद्दल शिक्षा झाली होती. पण अपीलात रद्द झाली. आरोपीला मॅजिस्ट्रेटपुढे हजर करण्यापूर्वी तब्बल पाच मिनिटे पोलिसांनी त्याचा जाबजबाब घेतला हे शिक्षा रद्द करण्याचे कारण कोर्टाने दिले.

कोर्टाच्या या निर्णयामुळे न्यायाच्या तराजूचा तोल ढळला आहे. पोलिसांच्या हाती पुढाकार राहिलेला नाही. अमेरिकन शहरातील गुन्हेगारी व हिंसाचारावर त्यांचे नियंत्रण राहिलेले नाही, असे मत सिनेटने व्यक्त केले आहे.

खुनांचे वाढते प्रमाण हा अमेरिकेतील एकंदर वाढत्या गुन्हेगारीचाच भाग आहे. तेथे दर २६ मिनिटांस बलात्कार, दर पाच मिनिटांस दरोडा, दर तीन मिनिटांस हल्ला, दर मिनिटास मोटारची चोरी, दर २८ सेकंदांस घरफोडी असे गुन्हे घडतात. गुन्ह्याचा शोध व बंदोबस्तासाठी वर्षाला २७०० कोट डॉलर्स खर्च येतो.

स्वातंत्र्य व हक्क यांची जबाबदारी व परिणामांशी सांगड न घातल्याने ही परिस्थिती निर्माण झाली. हे स्वातंत्र्य व हक्क यांवर निर्बंध घालणारे बिल सिनेटने नुकतेच पास केले. या बिलास कायद्याचे स्वरूप आल्यावर खासगीपणाच्या हक्काचा आधार (right to privacy) गुन्हेगारास घेता येणार नाही. आरोपीने स्वखुषीने दिलेले कबुलीजबाब ग्राह्य धरले जातील. आरोपीची अटक आणि त्याला कोर्टात

हजर करणे या दरम्यान वाजवीपेक्षा अधिक काळ गेला असेल आणि त्या काळात आरोपीचा कबुलीजबाब घेतला असेल तर तो ग्राह्य धरता येणार नाही असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला होता. पण या बिलाने असा पुरावा ग्राह्य धरण्याची तरतूद केली आहे.

## संघटित गुन्हेगारी

अमेरिकेतील गुन्हेगारीसंबंधी सिनेटच्या एका अहवालात म्हटले आहे की दुसऱ्या कोणत्याही देशात नसतील एवढ्या गुन्हेगारांच्या संघटना अमेरिकेत आहेत. मोठ्या कंपन्यांसारखे त्यांचे स्वरूप आहे. समाजात एखाद्या निमसरकारी संस्थेप्रमाणे त्या वावरतात. अनेक प्रकारच्या बेकायदा उलाढाली त्या करीत असतात. जुगारावर त्यांचे नियंत्रण असते. अन्न, कापड, घरे, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रांतही त्यांनी हातपाय पसरले आहेत. वर्षाला ७० लाख डॉलर्सची कमाई त्या करतात. सावकारीतूनही त्यांना बराच पैसा मिळतो. अशा या संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यास अमेरिकेची गुन्हेशोध यंत्रणा व पोलिस कोर्टे समर्थ ठरलेली नाहीत.

अमेरिकेतील वाढती गुन्हेगारी मनोविकृतीशी निगडित आहे. दहा लाख लोक वेड्यांच्या इस्पितळात असून ही संख्या तुरुंगातील कैद्यांच्या चौपट आहे. फक्त १८.५ टक्के लोक मानसिक दृष्ट्या चांगल्या स्थितीत असल्याचे कॉर्नेल विद्यापीठाच्या समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या पाहणीत आढळून आले. ५८.१ टक्के लोकांत सौम्य विकृती व २३.४ टक्के लोकांत तीव्र विकृती असल्याचे त्यांना दिसून आले. " या जगात जगायचे तर तुम्हांला शूर व वेडे झाले पाहिजे." या एका टॅक्सीवाल्याच्या उद्गारात अमेरिकनांची आजची मन:स्थिती चांगली व्यक्त झाली आहे.

व्हिएटनाम युद्धाचा ताण, निग्रो–गोरे वर्णसंघर्षाचा ताण, संपन्न राष्ट्र असूनही मोठ्या प्रमाणात असलेल्या आर्थिक विषमतेचा ताण हे विविध ताण असह्य होऊनच मनोविकृतींचे प्रमाण वाढलेले आहे. पंचवीस टक्के लोक दारिद्र्याच्या काठावर राहतात. उद्या आपण या तांड्यात सामील होऊ अशी भीती कामगार व कनिष्ठ मध्यमवर्गीयांना वाटत असते. कसबी कामगारांवरही मधूनमधून बेकारीचा प्रसंग ओढवतो व त्याला तोंड देण्यासाठी समाजकल्याण राज्यातील योजनांसारख्या योजना अमेरिकेत फारशा नाहीत. संपन्न अमेरिकनांनाही त्यामुळे असुरक्षित वाटते. एका आजाराने परिस्थिती बदलून एकदम तुम्ही गरिबीचे गर्तेत जाऊन पडू शकता. अशा या परिस्थितीत आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या अवास्तव कल्पनांत अमेरिकेतील आजच्या गुन्हेगारीचे मूळ आहे.

आपल्या कारकीर्दीची सूत्रे हाती घेताना महान समाजाचे ध्येयस्वप्न अध्यक्ष जॉन्सन यांनी आपल्यापुढे ठेवले होते. पण ते प्रत्यक्षात आणण्याचे दृष्टीने फारसे परिणामकारक उपाय योजले गेले नाहीत. त्यामुळेच गुन्हेगारी व खुनांचे प्रमाण कमी न होता वाढत आहे. O

प्रिय हिमानी,

आत्ता रात्रीचे किती वाजलेत कोण जाणे...कारण प्रहराचे टोल बराच वेळ ऐकू आले नाहीत. बरं, चंद्राच्या सावलीवरून कल्पना करावी तर बाहेर आभाळ आलंय...सगळ्या दिशांनी भरून गेलंय. कानावर गंभीर सुरातला सागराचा घनरव ऐकू येतो आहे. एकदम वीज चकाकली तरच उसळत्या लाटा दिसताहेत. रौद्र ढग दिसताहेत. अन्यथा अंधकार. खिडकीपाशी गेलं तर गार वारा अंगाशी झटापट करू लागतो. मोकळ्या ढगातून येणारा हा वारा कानात ओरडतो, तू स्वतंत्र केव्हा होणार आहेस ? बंदिशाळेच्या या काळ्या पाशातून तुझी सुटका केव्हा होणार आहे ? किनाऱ्यावर शतशः विदीर्ण होणाऱ्या लाटा मला विचारताहेत... तू मायभूमीला कधी परतणार ? त्यांना उत्तर कोण देणार ?...माझे भविष्य मी




हरवून बसलोय. मला फक्त भूतकाळ आहे हिमा, वर्तमान नि भविष्य...या काळ्या चिऱ्यात सामावले गेले आहे. माझे वर्तमान म्हणजे हे काळे पाषाण... बंदिगृहातील शृंखला...आणि भविष्य तेच ! त्याच शृंखला.. तेच पाषाण...फक्त त्यांच्यात वावरणारी एक व्यक्ती तारुण्य गमावून बसली असेल. वृद्धत्वाचा झेंडा मस्तकी भिरभिरत असेल. नसानसांतून वाहणाऱ्या गरम रक्ताची उष्णता कमी झाली असेल—यौवनाने बहरलेला हा देह सुरकुत्यांनी झाकोळून गेला असेल. हेच ते माझ्या भविष्याचे रूप !

कधीमधी येणारे ढग मनाला भूतकाळात घेऊन जातात. त्या वेळी मी सारे विस-

**भार्गव विनायक गोडबोले**

रतो. माझे मीपण विरघळून जाते. त्या वेळी भोवतालचे पाषाण हे दगड राहात नाहीत...त्यातून माईचा स्निग्ध हात आठवतो. हाता-पायातील शृंखला छोट्या सुहासच्या हाताचे विळखे वाटतात. नव्हे ज्या खुर्चीवर बसतो त्यातील शुष्क लाकूड नाहीसे होते ..आप्पाकाकांच्या मांडीवर बसल्यासारखं वाटते. या चिऱ्याचिऱ्यांतूनच सारी माणसे साकार होतात. माझ्याशी बोलतात... माझे शब्द अबोल होतात तेव्हा हिमा, माझी नजर खिळून जाते तेव्हा...हे सारे दगड, ही खुर्ची, या बेड्या सारे सारे बोलू लागतात. तुमच्यासारखेच. नाहीतरी आता माझे त्यांचे नातेच आहे. अतूट...अबोल ! मला आठवतोय तो दिवस...!

...त्या दिवशी मी खूप आनंदात होतो. माझ्या आवडत्या इच्छेला त्या दिवशी खरेखुरे स्वरूप लाभले होते. माझी निवड झाली होती भारतीय हवाईदलात...! मी पेढे आणले आणि देवाला ठेवले. अखेर सिद्धेश्वराने माझे म्हणणे ऐकले होते. त्या दिवशी आप्पाकाका अबोल होते. माई अबोल होती. छोट्या सुहासला काहीच समजत नव्हते. तो तर पेढ्यांवर खूष झाला होता. मी आनंदाने तुझ्या अण्णांना पेढे द्यायला निघालो होतो. पण दारातच अण्णा घरात नसल्याचे समजले...तुझ्या-कडून ! तू उत्सुक होतीस... मी एवढा का आनंदात आहे ते पाहायला...जाणून घ्यायला ! मी तुला पेढा दिला होता. तू कारणासाठी अडून बसली होतीस. शेवटी माझ्या हट्टाने तू पेढा खाल्लास...मी बोललो...मला कमिशन मिळाले हवाईदलात ! मी दोन दिवसांत जाणार दिल्लीला ! तू किती बावरलीस. तुझ्या बदामी डोळ्यांत एकदम भीतीची चमक दिसली मला. पापण्या थरारल्या...पाखरे भिरभिरली... मला वाटले, आता शिंपल्यातून मोती ओघळणार ! पण नाही ओघळले...त्यांचे तिथेच पाणी झाले. नेहमीच थट्टेखोर असणारा मी तुझ्या त्या स्वरूपाला पाहून गोंधळलो. त्याच पावली मागे फिरलो मी. जाण्यापूर्वी आदल्या दिवशी तुझ्या-बरोबर मी सिद्धेश्वरला आलो. तू अबोल होतीस...मीही ! काय बोलावे समजत नव्हते. कोणत्या अदृश्य बंधानी आपण बांधले गेलो होतो कुणास ठाऊक...पण मला त्या दिवशी एका वेगळ्या हिमानीचे दर्शन घडले होते.

...तुम्हा साऱ्यांचा निरोप घेतला तेव्हा फडफडणारे तुमचे रुमाल अजूनही माझ्या डोळ्यांसमोर दिसताहेत. बळेबळेच डोळे चोळत मी अश्रू पुसून टाकले. नव्या जीवनाकडे झेप घेतली. कोणत्याही पाखराला गगनात भरारी घेताना हे पाश हलके करून घ्यावे लागतात. नियतीचा नियमच आहे तो. नाहीतर त्याचे शरीर उडत राहते...आणि आत्मा खालीच राहिल्याने ते शरीर कुठेतरी पडून जाते...अनंतात ! नव्या जीवनाला सरावलो. एक दोन-सुट्या घेऊन घरी आलो. त्या चार दिवसांपुरती तुम्ही माणसे आनंदात असायचा. मग मात्र जाताना परत मोती ओघळायचे.

पण खरं सांगू का हिमा, मला वाटते हे अश्रू म्हणजे जीवनच ! नव्हे जीवनाचेच

दुसरे नाव अश्रू ! मी जाणार या कल्पनेनं तुझ्या डोळ्यांत तरळलेले अश्रू...मी आल्यावर तुम्हा सर्वांच्या नेत्रांत कोसळणारे आनंदाचे अश्रू...आणि आता वियोगामुळे ठिबकणारे अश्रू !...अश्रूच...प्रत्येक वेळी रंग वेगळा...भावना निराळ्या ! याचेच नाव जीवन –! नाहीतरी जीवन म्हणजे पाणीच की नाही ?...या अश्रूंना फार मोठी किंमत आहे. फार मोठी...!

...हो विसरलोच बघ...तर...त्या वेळीच युद्धाची घुमश्चक्री सुरू झाली...धडाडीने मी हवाईयुद्धात भाग घेतला. दहकत्या अग्निज्वालेत उडी मारताना पतंग काही विचार करतो का ? तीच आमची स्थिती होती. दररोज अनेक विमाने नाश पावत होती. कधी पतंगासारखी...कधी विजेत्या वैनतेयासारखी ! आणि एक दिवस...मी जायबंदी झालो. शत्रुप्रदेशात उतरणे भाग पडले आणि त्याच वेळी या कारावासात अडकलो. पुन्हा कधीही न सुटण्यासाठी !

...तेव्हापासून स्वातंत्र्याच्या जीवनाला पारखा झालो. दिवसरात्र विचाराने डोके दुखू लागायचे. मग औषध...हं ऽऽ...खिडकीपाशी जाऊन बसायचो. सागराचा खारा वारा भणाणून यायचा. नकळत मी कोणत्या अवस्थेत जात असे... परमेश्वर जाणे...जागा होई तेव्हा डोके थांबलेले असायचे. एका कालचक्राच्या वेगळ्याच चक्रात अडकलो आहे. या वेळी कधीकधी वाटते, हे तत्त्वज्ञान, भलेमोठे विचार वाचायला ठीक आहे. नाहीतर या अवस्थेत...काही उपयोग नाही. व्यवहाराची कठोर फळे ! आज या सागराच्या किनाऱ्याशी मी आईसाठी वेडा झालोय. विरहाच्या अग्नीत होरपळतोय. याच्याच दुसऱ्या किनाऱ्याला माझे बांधव जल्लोष करत असतील. त्यांना कदाचित कल्पनाही नसेल...या सागराच्या दुसऱ्या किनारी एक जीव तडफडतोय. त्याचे अश्रू...अश्रू कसले ! आता ते डोळेही शुष्क झालेत. एखादे दिवशी त्यांतली निरांजनेही मालवतील. कोण्या एका काळी कौतुकाच्या नजरांनी न्हालेला हा देह ज्वालांच्या पड्यात नाहीसा होईल.

... पण माझी इच्छा पूर्ण झालेली असेल तेव्हा. तुला आठवते, आपण कधीकधी सिद्धेश्वराच्या पाठीमागे असलेल्या तळ्यात पाय सोडून बसायचो. मासोळ्यांना चुरमुरे टाकून त्यांची चपळ हालचाल पाहताना तू मंत्रमुग्ध व्हायचीस. अन् त्याच वेळी मी मात्र वेगळ्या विचारांत गढलेला असे. माझ्या डोळ्यांसमोर मी माझा भविष्यकाळ उभा करत असे. मी म्हणायचोदेखील– हिमा, आपले जीवन कसे रानातल्या फुलासारखे असावे. निरपेक्ष त्याग ! रानातल्या फुलाला कल्पनादेखील नसते... त्याच्या क्षणभंगुर जीवनाची. स्वतःच्या अंगी असलेला सुवास दश-दिशांना फैलावत कधीतरी अचानक धरतीच्या कुशीत गडप होते ते. बस्स ! माझेही जीवन असेच असावे. आपल्या या सुंदर देहाचा उपयोग केवळ उपभोगासाठी नसावा. या जीवनलतेच्या आधाराने जर एखादे फूल विकसणार असेल तर अवश्य फुलू द्यावे. त्याच्याकडून उपकार-

फेडीचीही अपेक्षा करू नये. मला येणारे मरण असेच असावे. मी दुसऱ्यासाठी काहीतरी करत असतानाच ! मी त्या मृत्यूचे स्वागत करेन, नव्हे त्याला आपल्या मिठीत सामावून घेतच मी अंतर्धान पावेन. एखादा प्रियकर प्रेयसीच्या उन्मत्त चुंबनाची ज्या अधीरतेने वाट पाहील तितक्याच—किंबहुना त्याहूनही अधिक अधीरता त्या मृत्यूचे स्वागत करताना माझी राहील .. भान हरपून मी बोलत असे. तू मधून मधून तुझ्या नजरेने मला प्रतिबंध करायचीस. त्या स्वप्नात रमण्यात-देखील मला फार आनंद वाटायचा. आणि माझे ते स्वप्न बऱ्याच अंशी सफळ होते आहे. फक्त कधी कधी कोते मन अशा मृत्यूचे स्वागत करायला बावरते. आणि म्हणूनच वेगळेच विचार मनात येऊ लागतात. पण अशा वेळीसुद्धा मोवतालचे पाषाण मला माझा खरा मार्ग दाखवतात. लवलवत्या ज्वाला आलिंगण्याचा ! हे वाचून तू मला वेडा म्हणशील होय ना ? पण काय ग, मागे एकदा एक प्रसिद्ध वक्ते बोलले होते .. वेडीच माणसे काहीतरी कार्य करतात. कारण, विचारी माणसासारखा नेहमीचा समतोलपणा त्यांचेपाशी नसतो. बरं ते जाऊ दे.

बाहेर आभाळ निवळलंय. माझ्याही मनातले वादळ आता शांत होऊ लागले आहे. समोर हळूहळू चांदण्या दिसू लागल्या आहेत. समोरची चांदणी तर शुक्राचीच असेल असे मला वाटते. दररोज पहाटे तो शुक्र माझ्यावर स्निग्ध नजर ठेवतो. कणाकणाने जळणाऱ्या एका जीवनाकडे तो पाहतो आहे .. स्वतःही जळतच. मला तर खूप आनंद होतोय. मृत्यूच्या त्या क्षणाकडे माझ्या डोळ्यांतले तारे गंभीरपणे पाहात आहेत.. हिमा, आजवर खूप यातना सहन केल्या .. याच यातनातून कायमच्या मुक्तीसाठी लागणारे मनोधैर्य तू दे . देतच आहेस. खरंच, तुझ्या पोरक्या जीवनाचा स्निग्ध नंदादीप अनेकांना प्रकाश देण्याइतका समर्थ आहे खास !

पण काय ग, हे पत्र तुला केव्हा मिळेल ? दैवच जाणे. इतक्या दिवसांत तुझा आत्मविश्वास ढळला असेल ? मला नाही वाटत तसे ! पण जर तुला हे पत्र मिळाले तर तर.. त्या वेळी बहुधा मी या जगात नसेन. अनंताच्या प्रवासासाठी तुझा निनाद गेला असेल. तुला हे पत्र एवढ्याचसाठी लिहिले की निनाद शेवटपर्यंत झगडत राहिला हे तुला कधीकाळी समजावे. त्या वार्तेने तरी तुझ्या दुःखाश्रूंचे आनंदाश्रूंत रूपांतर होईल. क्षणभर का होईना तुझा जीव सुखावेल. कोमेजलेल्या प्राजक्ताचा सुगंध तुझ्या प्रीतिपुष्पाला येईल. आता थांबतो. छोट्या सुहासला तुझ्या कुशीत घेऊन सांग— तुझा दादा दूर गेलाय... पण हे सारे करताना तुला तुझे अश्रू आवरावे लागतील. सगळ्यांचे अश्रू पुसताना तुला तुझी आसवी गोठवावी लागतील. त्यातूनही मोती ओघळले तर ते आनंदाचे असू देत .. मी सांगितलेले हे सारे तुला आणि तुलाच करावे लागेल. तुझ्या निनादसाठी तुझे आनंदाश्रू पाहण्यासाठी मी कोठूनही येईन .. त्या वेळी, पण ते अश्रू आनंदाचे हवेत हं ! नाहीतरी जीवनाचेच दुसरे नाव अश्रू... हो ना ?

तुझा,
—निनाद.

# पुस्तकं

## फक्त

१ २ ३ ४ ५ ६ ७

'फक्त' या सायक्लोस्टाइल लिट्ल मॅगझिनचे सहा अंक माझ्याकडे येऊन बरेच दिवस झाले. अनेक व्यवधानांमुळे ते वाचायचे राहून जात होते. शेवटी काल सगळे अंक वाचून काढले. (एका दमात !...हेही विशेषच.)

"फक्त तुम्ही वाचा. इतरांना वाचायला द्या. आणि मागवा." असे या अंकाच्या पृष्ठभागी लिहिलेले आहे, आणि किमतीचा निर्देश कुठेही नाही; त्याअर्थी हे 'धंद्या'साठी काढलेले मासिक नाही हे उघडच आहे. नवीन लेखक–कवींच्या नवीन विचारांना व नवीन लिखाणाला प्रसिद्धीचा प्रकाश दाखवावा हे या मासिकाचे उद्दिष्ट आहे. वरील सहा अंक चाळल्यानंतर त्याची जाणीव होते.

थोडक्यात या अंकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

**अंक पहिला :** जयंत नेरूरकर यांच्या कविता. त्यातली 'एगो' ही पहिली कविता चांगली. अनुभूतीच्या आत्मविश्वासाने लिहिलेली. त्यामुळे परखडपणा, कसदारपणा वगैरे गुणविशेष या छोट्याशा कवितेत उतरलेले. पण पुढच्या कवितांत हे नाही. 'इंटरव्ह्यू' ही विस्तृत कविता त्यामुळे अगदीच पसरट झाली आहे. त्यातील 'मूड' चांगला हळुवारपणे जोपासलेला आहे. पण बांधीवपणाबरोबरच धारदार कंगोऱ्यांचाच अभाव, त्यामुळे नुसते उसने अवसान वाटते. प्रतिमांच्या भिन्नभिन्न पातळ्यांत पारस्परिक संबंध नसतानाही एकसूत्र राखण्याचा केलेला अट्टाहास हेही याचे कारण असू शकेल. 'कवचकुंडलं', 'युयुत्सू', 'धडपड' या अशाच फसलेल्या कविता. दोन–तीन मूड्स्, दोन–तीन प्रतिमा यांची सैराट भाषेत

---

**'फक्त' तुम्ही वाचा. इतरांना वाचायला द्या.**

---

केलेली भेळ. अनुभूतीची तीव्रता भासवायचा दुबळा प्रयत्न. नुसता साबणाचा फुगा. त्याला कुठेही निश्चित आकार नाही. निश्चित आकाराची अपेक्षा नसली तरी निदान परिणामकारकता, निदान प्रतिमाकृतीचे अनुसंधान तरी ? तेही नाही.

"डोळयाबाहेरील लाख भुतं–दोन डोळयांना हातोहात फसवीत
सक्तीचे कोडे–रिकाम्या चौकटी
पण पदार्थांत गुरफटलेली सुखाने मरते सिनेनटी"

यांसारख्या ठिकाणी मर्ढेकरी–परंपरेतील सिनिसिझमचे आकर्षण दिसते. पण तेथे आंतरिक तळमळीचे प्रतिबिंब नाही. त्यापेक्षा मग

"निरपराध्यांच्या समाधीवर डोकं ठेवून
प्रामाणिक सती युगभर रडली"

अथवा "प्रलयकाळच्या भीषण रात्री
देवमाशाला कळलेली सूत्रं
मनूलासुद्धा नसतील कळली"

यांसारख्या स्पष्टीकरणात्मक औपचारिक उपयोगासाठी आलेल्या प्रतिमाही करवती परिणाम करून जातात. 'लिफ्ट मी प्लीज' या कवितेतही शुद्ध निराकार अनुभवाची लय निराकार आविष्कृतीतूच घडविण्याचा यशस्वी प्रयत्न. 'तळयात की मळयात'ची आवर्तने तेथे पोरकट वाटत नाहीत. 'गॉड ब्लेस माय सोल' या कवितेत तशी वाटतात. "माझी थोडी धाई होतेय" हे या कवितेतील एक वाक्य कवीच्या एकंदरच अभिव्यक्तीचे सूत्रवाक्य मानण्यास हरकत नाही.

**अंक तिसरा :** चंद्रकांत खोत यांच्या 'बाटलेल्या कविता.' या सहा अंकांमध्ये मला आवडलेल्या दोन कवितांपैकी एक. कवितेतील शब्द अनुभूतीच्या गाभ्यातून कोरून काढल्यासारखे चपखल. आता त्यातही 'कातचुना'सारखी पारंपरिक स्वस्त प्रतीके आहेत. पण बहुतेक सर्वत्र स्वत्वाने मारलेली रम्य बांधणी आहे.

"कौलारातुन वळत्या रेषा
वळता वळता बूच उडावे
फसफसणाऱ्या तुझिया नेत्री
फेनफुलांचे पक्षी गावे"

अशा प्रतिमांमधून स्वस्त पारंपरिकताही ताजेपणाने न्हाऊन निघते. सरळ वाहात जाणाऱ्या कवितेचा शेवट एकदम तीव्र, उत्कट करण्याची किमया बऱ्याच ठिकाणी. कधी कधी हा शेवट अघोरेखेसारखा. 'बाळंत रस्ते', 'हातोडी व खिळे' यासारख्या प्रतिमा पुनः पुन्हा आलेल्या. 'लावण्य', 'दूध आले उतू', 'छळ' या काही रम्य कविता. स्वतःच्या प्रतिमासृष्टीचे खोतांनी बोरकरांशी जोडलेले नाते इथे पटते. जर्द उन्हात भिजलेल्या कांतीची शपथ, ऊन कात्रून कात्रून बनणारी कातरसांज, वळ बनून मांडीवर येणारी हिरव्या संभोगाची काळी बट, मनावर

नक्षी कोरणारा ऊरविलास, भरतीच्या लाटांची साय खोवून ळडोचांना आलेले उधाण—ही बोरकरी प्रतिमासृष्टीत रमणाऱ्या खोतांच्या कल्पनाविलासाची काही रम्य उदाहरणे. तरल अनुभूतीला सुडौल घाटात कोरण्याचा बराचसा यशस्वी प्रयत्न. या कवीने आणखी खूप लिहीत गेले पाहिजे असे वाटते.

**अंक चौथा :** मनोहर ओक यांच्या कविता : 'बाराखडी.' मला स्वतःला यातली अनुभूतीची आकृती अथवा भावनेची पार्श्वभूमी जाणवू शकली नाही. काही प्रतिमा, काही कल्पना, काही मनावरील ठसे यांची लांबलचक यादी वाचल्यासारखे वाटले. नुसते शब्द. कुठल्याही दृष्टीने त्यांना 'वजन' नाही.

**अंक पाचवा :** रमेश पानसे यांचे 'आकृतिबंधा'वरील काही विचार, काही 'लघुत्तम कथा' आणि काही कविता. कवितेचा आकृतिबंध आणि त्यामध्ये जोपासलेला मूड यांचे आकृतिसह विश्लेषण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. या मांडणीच्या काही प्रकारांची चर्चा केली आहे. आणि श्री. नारायण सुर्वे यांच्या दोन कवितांचे या दृष्टीने विश्लेषण करून दाखविले आहे. परंतु शेवटी साकल्याने पाहता हा विचार कवितेच्या रचनेकडे एकाग्र करणारा म्हणजे वरवरचा आहे. कवितेच्या अंतरंगाशी तो हवा तितका सांधून घेता आलेला नाही. आशय आणि अभिव्यक्ती यांचे संश्लेषण लेखकाला अभिप्रेत असले तरी ते लिखाणातून आलेले नाही. काही ठिकाणी विधानांतील विसंगती आढळली. कवितेच्या आकृतिबंधाची जाणीव होण्याच्या दृष्टीने हा एक चांगला प्रयत्न म्हणावा लागेल, इतकेच. पानशांच्या 'लघुत्तम' (की लघुत्तम ?) कथांच्या मागची कल्पना चांगली आहे. पण त्याचा आस्वाद घ्यायला मलतीच संवेदनशीलता पाहिजे.

> "भग्न हृदयाचे । जेव्हा झाले लग्न ॥
> तेव्हा आम्ही नग्न । मृत्यू पीतो ॥"
> किंवा "प्रेताच्या पायाशी । प्रेमाने बसावे
> आणिक पुसावे । पापपुण्य."

यांसारख्या छोटचा कवितांतून चमकणारी, अनुभूतीला काव्याकार देणारी प्रतिमा अपेक्षा निर्माण करते.

**अंक सहावा :** बाबुराव बागुल यांच्या विद्रोहाच्या कविता. मला आवडलेले दुसरे कवी. दुःखाला मरण देणाऱ्या पहिल्या कवितेसारख्या शैलीवरून खांडेकरांच्या हळव्या रूपककथांची आठवण होते. पण

> "तुझ्या देहाची मदिरा होत असेल तर
> मला बेहोष कर.
> अथवा तुझ्या देहाची कारा होत असेल तर
> मला डांबून ठेव."

यासारख्या कवितेतून व्यक्त होणारी बेहोषी, उत्कटता आणि आपल्या अनुभूतीचा

वेगळेपणा जोपासून ठेवण्याची वृत्ती मला आवडली. इथले दु:ख हे अंतरातून उमलून आलेले दु:ख आहे असे वाटावयास लावण्याइतकी अभिव्यक्ती आशयात भिजलेली आहे. जबाब मागणारा खराखुरा प्रक्षोभही काही ठिकाणी आहे. प्रामाणिकपणा आहे. आपोआप आलेला रम्य कलाविष्कार आहे. सहन झाले नाही म्हणून हे लिहिणे आहे. ' म्हाताऱ्या देशात यंत्रयुग आले ' ही एकच कविता माझ्या अभिरुचीला पटली नाही.

**अंक सातवा** : भाऊ समर्थ यांचे गद्य दीर्घ आत्मनिवेदन. एका प्रभावी कलंदराची हृदयस्पर्शी कहाणी. तिला चौकट नाही. पण त्रिमिती आहे. ' इफेक्ट ' आहे. भरीवपणा आहे. आणि मुख्य म्हणजे गडद रंग आहेत. निर्भीडपणा हा त्याचाच परिणाम असावा.

असे हे ' फक्त ' सहा अंक. काही चांगले लिखाण ह्यातून वाचायला मिळेल अशी आशा वाटते. पण सायक्लोस्टाइल केलेल्या ह्या अंकांचा प्रवास कुठवर घडेल ते सांगता येत नाही, काही असो. हा एक प्रयत्न आहे, चांगला प्रयत्न आहे आणि सातत्याने चालू राहिला तर त्याच्या भवितव्यालाही आकार प्राप्त होण्यास हरकत नाही. नव्या पिढीची वाङमयदिशा यावरून समजू शकेल. निदान ती अगदी दिशाहीन नाही एवढे तरी.

**— निशिकांत मिरजकर**

[ **' फक्त '**— अंक : संकलक — सतीश काळसेकर : प्रदीप नेरूरकर, नारायण बांदेकर ]







# रूपवती भार्या शत्रुः!

## १

पंजाबमधील एक गाजलेला खून खटला

अॅड. माधव कानिटकर

मुलगा ठीक वागत नव्हता म्हणून त्याचे लग्न करून दिले. देखणी सून घरात आली! आणि तिने कूळ बुडविले! लावण्यवती सून आपले मातृत्व विसरली! तिच्या व्यभिचारातून निर्माण झालेल्या एका भीषण खुनाची ही सत्यकथा.

"माघो! दगड लांब फेकण्याची शर्यत लावतोस? पाहू या कुणाचा दगड अधिक लांब जातो ते!"

"चल लावू या, नाहीतरी मला कंटाळाच आला आहे."

१२ मार्च १९५० या दिवशी पूर्व पंजाबातील छाट या खेड्यापासून दूरवर असलेल्या उजाड माळरानावर माघो आणि चंदर गुरे चारण्यासाठी आले होते. दुपारचे १२ वाजलेले होते. आजूबाजूला ओले गवत फारसे नसल्यामुळे मिळतील ती छोटी छोटी हिरवी झुडपे खात खात दोघांचीही गुरे फार लांब गेली होती. संध्याकाळपर्यंतचा वेळ कसा घालवावा याचा दोघांनाही प्रश्न पडला होता. दगड फेकण्याच्या शर्यतीची कल्पना चांगली होती. दोघांनीही वेगवेगळ्या आकाराचे दगड जमा केले. आणि दगडफेकीला सुरुवात झाली! चंदरचा एक दगड फारच लांब गेलेला बघून माघोला चेव आला. एक मोठा दगड उचलून त्याने उजवा हात जरा

मागे नेला आणि असेल नसेल तेवढा जोर काढून त्याने दगड भिरकावला... ... वेगाने निघालेला दगड कुठे पडतो ते बघण्यासाठी दोघांनीही समोर पाहिले... आणि तो दगड तिथूनच थोडया दूरवर असलेल्या विहिरीत पडला ! ... आणि तळाशी गेल्यावर " ठा ऽ ऽ ऽ क् " असा मोठा आवाज आला ! विहिरीतल्या कुठल्यातरी वस्तूवर दगड आपटला होता तर !

चंदरचे व माधोचे कुतूहल जागृत झाले ! नकळत शर्यत विसरून दोघेही विहिरीवर गेले. दोन्ही हातांचे कोपरे विहिरीच्या बोकलावर टेकवून आणि पायांचे चवडे जमिनीपासून उंच करून दोघांनीही आत डोकावून पाहिले. विहिरीच्या तळाशी अगदी थोडे पाणी आणि शेवाळे होते. विहिरीचा कातळ स्पष्ट दिसत होता... आणि त्यामध्येच कुलूप लावलेली एक भली मोठी ट्रंक वेडीवाकडी पडलेली स्पष्ट दिसत होती ! गावापासून दूर असलेली ही विहीर वापरात नव्हती. विहिरीच्या तळातून एक चमत्कारिक घाणेरडा वास वर येत होता. विहिरीच्या जवळच असलेला एक धोंडा माधोने उचलला आणि नेम धरून ट्रंकेवर मारला. विहिरीच्या तळात " ठा ऽ ऽ ऽ क् " असा आवाज पुन्हा एकदा घुमला पण ट्रंक हललीदेखील नाही ! ४

" खाली उतरून बघू या का ट्रंकेत काय आहे ते ? "

" कसा उतरणार ? विहिरीला पायऱ्या कुठे आहेत ? "

दोघांचा नाइलाज होता. संध्याकाळी आपआपली गुरे हाकीत दोघेही गावात शिरले आणि गावाबाहेरच्या विहिरीत आपण एक कुलूप घातलेली मोठी ट्रंक पाहिल्याचे त्यांनी सहजपणे बऱ्याचजणांना सांगितले.

हातात जाडजूड सोटा घेतलेला पोलिस पाटील थोडया वेळाने माधोच्या बापाकडे आला, " काय रे पोरा ! " दंडा सरसावीत त्यांनी माधोला फैलावर घेतले, " काम नाही, धंदा नाही. उगाच कंडया पिकवीत गावभर फिरतोस ? कसली ट्रंक आणि कुठे आहे ती ? "

सुरवातीला घाबरून गेलेल्या माधोला ट्रंकेची चौकशी ऐकून जरा धीर आला ! पोलिस पाटलांना बरोबर घेऊन माधो आत्मविश्वासाने विहिरीकडे चालू लागला आणि त्यांच्या मागोमाग गावातल्या रिकामटेकडया लोकांचा घोळका आपोआप जाऊ लागला.

विहिरीच्या बोकलाजवळ येऊन माधो आत डोकावला आणि अर्धवट विहिरीच्या तळाकडे आणि अर्धवट पाटलांकडे पाहात उजव्या हाताचे बोट तळाकडे करून म्हणाला, " खोटं नाही सांगत पाटील, ती बघा ट्रंक ! "

पोलिस पाटलांनी आत डोकावून पाहिले. विहिरीच्या तळाची ट्रंक नीट पाहून घेतल्यावर नाक दाबून घेत पाटील विहिरीपासून दूर झाले ! तळातून येणारा घाणेरडा वास आता असह्य झाला होता ! घोळक्यातील प्रत्येकाने विहिरीत डोका-



...तोच आतील जोरामुळे ट्रंकेचे झाकण ताडकन् उघडले गेले.

वून 'ती' ट्रंक पाहिली ! आणि पाटलांभोवती सगळे गोळा झाले.

"काहीतरी भानगड दिसत्ये पाटील !"

"... ... ... ..."

"कांय असेल ट्रंकेत ?"

"... ... ... ..."

"दागिने आणि पैसे असतील ! दरोडेखोर पुष्कळदा लुटीचा माल ट्रंकेत भरून विहिरीत टाकतात आणि मग सावकाश घेऊन जातात."

"... ... ... ..."

"पाटील ! ट्रंक वर काढू या ?"

इतका वेळ मौन धरलेले पोलिस पाटील आता मात्र संतापले आणि घोळक्या-वर खेकसले, "तुम्ही लोक गप्प बसायला काय घ्याल ? तुम्ही ऑर्डिनरी लोक आहात ! मी 'गव्हर्नमेंट सर्व्हंट' आहे ! रायटिंगमध्ये हुकूम असल्याशिवाय ट्रंक वर कशी काढणार ? माझ्या 'पावर'च्या बाहेर नाही जाणार ! ट्रंक वर काढली तर पंचनामा करावा लागेल आणि पंचनामा करायची पावर मला नाही ! माझं काम

'पोलिस स्टेशनला खबर देण्याचं आहे, तेवढं मी करून येतो तुम्ही जा आपल्या घरी !'

इतका प्रकार होईपर्यंत संध्याकाळचे ६॥ – ७ झाले होते. अंधार हळूहळू पसरू लागला होता तरीदेखील पोलिस पाटील ६ मैल दूर असलेल्या पोलिस स्टेशनवर 'खबर' द्यायला निघाले.

पाटील पोलिस स्टेशनवर गेले तेव्हा ड्यूटीवर असलेले सब-इन्स्पेक्टर इंद्रसिंग कुठल्यातरी "इन्क्वायरीला" बाहेर गेले होते. केव्हा परत येतील त्याचा नेम नव्हता. पोलीस स्टेशनवरच्या हेड-कॉन्स्टेबलने प्रथम पाटलाच्या 'ट्रंकेची' गोष्ट हसण्यावारी नेली ! पण पाटील मात्र गंभीर होते. विहिरीतून येणाऱ्या घाणेरड्या वासाने पाटलांना कसलातरी दाट संशय येत होता. आपण स्वतः ती ट्रंक पाहून आल्याचे सांगून काहीतरी मोठा गुन्हा याच्यामागे असल्याचा आपला संशय त्यांनी हेड-कॉन्स्टेबलच्या मनावर ठसवला. उगाच पुढे–मागे भानगड नको म्हणून अनिच्छेने का होईना पण हेडकॉन्स्टेबलने रजिस्टर पुढे ओढले आणि ट्रंकेची खबर (First Information Report) थोडक्यात लिहून घेतली. साहेबांची बराच वेळ वाट पाहून त्याने म्हटले,

"पाटील ! तुम्ही जा आता..."

"पण त्या ट्रंकेचं काय करायचं ?"

"अहो काय त्या ट्रंकेचं एवढं घेऊन बसलाय राव ! काढा की वर ! काही विशेष असलं तर सकाळी आम्हांला खबर द्या. मग बघू !"

"मग तसं मला लेखी द्या ऽ ऽ म्हणजे उद्या काही भानगड नको ऽ ऽ !"

हेड-कॉन्स्टेबलने पुन्हा एकदा रजिस्टर पुढे ओढले आणि पूर्वी लिहून घेतलेल्या मजकुरापुढे आणखी चार ओळी खरडल्या "सब-इन्स्पेक्टर साहेब बाहेर गेलेले असल्यामुळे आणि पोलिस स्टेशनवर "स्टाफ" कमी असल्यामुळे पोलिस पाटील श्री. ......... यांना हुकूम देण्यात येत आहे की त्यांनी सदरहू ट्रंक वर काढावी मात्र ट्रंकेत काय मुद्देमाल मिळतो याची त्यांनी या पोलिस स्टेशनला ताबडतोब खबर द्यावी !"

पोलिस पाटलांनी रजिस्टर पुढ ओढून रजिस्टरमधला 'हुकूम' नीट वाचून पाहिला ! आणि आपल्याला योग्य ती 'पावर' दिलेली आहे याची खात्री पटल्यावर पुन्हा ६ मैल परत चालत येऊन ते मध्यरात्री घरी येऊन 'सकाळी काय ते बघू !' या विचाराने आडवे झाले.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून पोलिस पाटील तडक महारवाड्यात गेले आणि ५–६ महार बरोबर घेऊन त्यांनी वाण्याला दुकान उघडायला लावले. एक भला मोठा जाडजूड दोरखंड व लोखंडी आकडे लावलेला गळ या साहित्यानिशी पाटील विहीरीकडे निघाले. आदल्या दिवशीच्या बातमीमुळे गावात कुतूहल होतेच. आपापली कामे सोडून बरेच लोक त्यांच्या मागोमाग विहिरीवर आले.

आजूबाजूला कुजट वास चांगलाच पसरला होता. विहिरीत डोकावून पाहणं केवळ अशक्य होते. मात्र असल्या कामाची सवय असलेली महारमंडळी पुढे झाली आणि त्यांनी विहिरीच्या बोकलावर उभे राहून गळ आत फेकला. लोकांची उत्सुकता शिगेला पोचली. दोरखंड ओढून पाहिला तो नुसताच गळ वर आला ! ट्रंकेची एकमेव कडी सोडता गळ अडकून बसेल अशी जागाच नव्हती ! बराच प्रयत्न केल्यावर अखेर एकदा गळ ट्रंकेच्या कडीत अडकला ! पण दोरखंड ओढल्यावर ट्रंक फक्त जागची थोडी हलली ! सबंध ट्रंक वर ओढणे हे एकट्या-दुकट्याचे काम नव्हते ! ट्रंकेत बराच जड 'मुद्देमाल' असला पाहिजे ! पोलिस पाटलांनी लांबूनच महार मंडळींना धीर दिला आणि अखेर एकमेकांचा आधार घेऊन ५–६ महारांनी जोर लावल्यावर सबंध ट्रंक तळापासून थोडी वर उचलली गेली ! घाणेरड्या वासाची पर्वा न करता इतर लोकही धावले आणि बऱ्याच वेळानंतर शेवाळयाने बरबटलेली, पाण्यात अर्धवट भिजलेली आणि घाण वास मारणारी ती ट्रंक विहिरीच्या बाहेर आली !

वेडीवाकडी बाहेर आलेली ट्रंक महारांनी नीट जमिनीवर ठेवली. पाटलांच्या हुकमाने कोणीतरी त्यांना एक मोठा दगड आणून दिला. ट्रंकेच्या भोवती जमून बघ्ये लोक एकमेकांच्या खांद्यावरून डोकावून पाहू लागले. दगड मारून कुलूप तोडण्याच्या प्रयत्नांत पाटील असतानाच केव्हातरी कुलूप उघडले गेले होते. आणखी एक फटका हाणण्यासाठी पाटलांनी हात वर केला......तोच आतील जोरामुळे ट्रंकेचे झाकण ताडकन उघडले गेले !

......आणि पाटलांसकट सर्वजण भीतीने एकदम दूर पळाले ! बरेच दिवस पाण्यात राहिल्यामुळे फुगलेले एक प्रेत ट्रंकेतून अर्धवट बाहेर आले होते !

ट्रंक बंद असताना प्रेताचे मुंडके त्याच्या दोन मांड्यांत घुसवून त्या प्रेताची दोनदा घडी घालून ते ट्रंकेत दाबून भरल्याचे त्याच्या एकंदर अवतारावरून स्पष्ट दिसत होते ! कुणाचा तरी खून झाला असावा हे पोलिस पाटलांनी ताबडतोब जाणले आणि टाकोटाक ट्रंकेत काय 'मुद्देमाल' मिळाला ते त्यांनी ६ मैल दूर असलेल्या पोलिस स्टेशनला कळवले.

मधल्या वेळात गर्दी वाढू लागली होती. ट्रंकेतून अर्धवट बाहेर आलेल्या प्रेताला अत्यंत कुजट वास येत होता आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे कुणाचा खून झालेला आहे हे कळायला मार्ग नव्हता ! प्रेताचे मुंडके पूर्णपणे सडून गेल्यामुळे त्याला 'चेहरा' जवळ जवळ नव्हताच ! (Victim's face was past recognition)

पोलिसांच्या जीपची सायरन ऐकू येऊ लागली तशी गर्दी आपोआप बाजूला झाली. वेडीवाकडी वळणे वेगाने घेत जीप विहिरीजवळ येऊन कर्कश्श आवाज करून थांबली. सब इन्सपेक्टर इन्द्रसिंग उडी मारून खाली उतरले, त्यांच्या मागो-

माग ॲसिस्टंट सिव्हिल सर्जन उतरले. पोलिस पाटलांनी पुढे होऊन सलाम ठोकला आणि काहीही न बोलता हातानच ' ट्रंक ' दाखवली ! अर्धवट ट्रंकेत आणि अर्धवट जमिनीवर पडलेल्या प्रेताभोवती इन्स्पेक्टर इंद्रसिगांनी एक फेरी मारली. सरकारी फोटोग्राफरला यायला बराच वेळ लागणार होता आणि प्रत्येक मिनिट महत्त्वाचे होते. हा खूनच असला पाहिजे अशी इन्स्पेक्टर इन्द्रसिगांचीदेखील खात्री पटली होती. त्यांनी प्रेताची काळजीपूर्वक तपासणी सुरू केली. ' चेहऱ्यावर ' एके ठिकाणी मांस जळल्याची स्पष्ट खूण होती. प्रेताच्या डोक्यावर अजिबात केस नव्हते. प्रेताच्या अंगावर अर्धवट जळलेला आणि भिजलेला सूट होता ! नेकटाय खालच्या बाजूने अर्धा जळला होता ! खून झालेली ' व्यक्ती ' पांढरपेशा वर्गातली व श्रीमंत असली पाहिजे (Upper Stratum of Society) प्रेताच्या हातातले कडे आणि ट्रंकेत सापडलेले किरपाण यावरून मृतव्यक्ती शीख असावी याबद्दलही त्यांची खात्री पटली. मात्र सबंध शरीरावर कुठेही जखम नव्हती ! खून केल्यानंतर गुन्हेगारांनी प्रेत जाळून टाकण्याचा प्रयत्न केला होता हे निश्चित. पण मृत्यूचे कारण मात्र ते नव्हते. पोस्ट-मार्टेम केल्याशिवाय काहीच कारण सांगता आले नसते. इन्स्पेक्टर इन्द्रसिगांनी दूरवर पाहिले. सरकारी फोटोग्राफर यायची अजूनही चिन्हे नव्हती...... आणि बरेच दिवस ' आत ' राहून आता बाहेरची हवा लागलेले ते प्रेत प्रत्येक मिनिटाला अधिकच सडून जात होते (The process of decay was rapidly making the corpse more abhorrent every minute.)

......अखेर त्या स्थितीत प्रेताचा फोटोग्राफ न घेण्याचा निर्णय घेऊन. इन्स्पेक्टर इन्द्रसिगानी पंचनामा लिहायला सुरुवात केली. सुरुवातीलाच प्रेताच्या अंगावरील कपडे ताब्यात घेण्याच्या हेतूने त्यांनी प्रेतावरील सूट काढण्याचा प्रयत्न केला...... पण सूट शरीरातून निघेना !

......बरेच दिवस पाण्यात पडून असल्यामुळे प्रेत तट्ट फुगलेले होते ! अखेर ते कपडे फाडून काढावे लागले. प्रेताबरोबरच ती ट्रंक व ' त्या ' ट्रंकेत मिळालेली एक चादर ताब्यात घेऊन ते उघडे-नागडे बेवारशी प्रेत त्यांनी ॲसिस्टंट सिव्हील सर्जनच्या ताब्यात दिले. पोस्ट मार्टेमचा रिपोर्ट शक्य तितक्या लवकर देण्याची त्यांना विनंती करून इन्स्पेक्टर इन्द्रसिग तडक पोलिस स्टेशनवर गेले आणि पंजाब राज्यातल्या प्रत्येक प्रमुख पोलिस स्टेशनला टेलीफोनने कळविले की ' गेल्या १–२ महिन्यांत एखादी व्यक्ती–विशेषत: उच्च वर्गातली शीख व्यक्ती–बेपत्ता झाल्याची तक्रार तुमच्याकडे आली असल्यास या पोलिस स्टेशनशी संपर्क साधा व कोणी नातेवाईक चौकशीला आल्यास त्यांना इकडे पाठवून द्या–' (अपूर्ण)

[ पंजाब हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश जी. डी. खोसला यांच्या ' A Judge's Note-Book ' मधील " Evidence Against Palvindar Kaur ' चे स्वैर रूपांतर. ]




# अकलेचा तराजू

**ब. मो. पुरंदरे**

विजापूर दरबारात मुरार जगदेवांचा दबदबा फार मोठा होता. मुरारपंत शूर होते आणि मुत्सद्दीही होते. आदिलशाहीची ते इमानेइतबारे चाकरी करीत होते. बादशाह मुहम्मद आदिलशाह् इस्लामचा अत्यंत अभिमानी होता. हिंदूंच्या इमानाइतबाराचीही त्याला फारशी पर्वा वाटत नसे. मुरारपंत त्याच्या दरबारात वजिरीच्या पदापर्यंत पोहोचले ते बादशाहाच्या खूषमर्जीमुळे नव्हे. बादशाहाच्या निरुपायामुळे. मुरारपंतांनी आदिलशाहीत आपल्याला अनुकूल असलेल्या सरदार-मनसबदारांचा वळकट गट बनविला होता. शिवाय गोवळकोंड्याचे

कुतुबशाहीत आणि नगरच्या निजामशाहीतही त्यांनी आपले वजन ठेवले होते. निजामशाहीतील शहाजीराजे भोसले तर पंतांचे फार प्यारे दोस्त होते. अशा सावध चतुराईने पंतांनी विजापूर दरबारात आपली जरब राखली होती. पंतांच्या विरुद्ध असलेले मुस्तफाखान, अफजलखान वगैरे सरदार पंतांच्या बुद्धिबळामुळे आणि दळबादळामुळे निमूट दबून होते.

मुरारपंतांच्या दाराशी हत्ती झुलत होते. पंतांच्या कर्तबगारीचा दिमाख असा होता की, पंतांची रिकामी पालखी किंवा अंबारी जरी रस्त्याने चालली तरी लोकांच्या माना तिच्यापुढे मुजऱ्यासाठी झुकत. पंतांच्या घरी सारं काही होतं. वैभव होतं. सत्ता होती. मान होता. पण एका गोष्टीमुळे पंत दुःखी होते. त्यांच्या अंगावरती एक कसला तरी रोग उमटत होता ! ते फार फार दुःखी होते. रोग बरा व्हावा यासाठी ते अपरंपार पैसा खर्च करीत होते. औषधोपचार करीत होते. आता खरोखर कोणता वैद्य शिल्लक उरला नव्हता. औषधं घ्यायची राहिली नव्हती. विकार मात्र कणाकणाने बळावत होता.

एकदा मुरारपंतांना कळलं की, पुण्याच्या ईशान्येला आठ कोसांवर भीमा-इंद्रायणीच्या संगमावर कुणी एक सत्पुरुष आहे. त्याला काही सिद्धी प्राप्त आहेत. तो सत्पुरुष जर कृपा करील तर हा कुष्ठरोगा-सारखा विकार पार नाहीसा होईल.

पंत मोठ्या आतुर आशेने निघाले. भीमा आणि इंद्रायणी यांच्या संगमावर आले. संगमालगत तीरावर एक छोटेसे सुंदर गाव होते. गावाचे नाव नागरगाव. गावाबाहेर एका शिवालयात तो विरागी सत्पुरुष राहात होता. शिवालयातील शिवशंकराचं नाव होतं, ' संगमेश्वर. ' देऊळ प्राचीन, सुंदर, डौलदार, पण मोडकळीस आलेले.

पंत पायउतार झाले. त्यांनी हात जोडले आणि अनवाणी होऊन ते त्या पडक्या-मोडक्या शिवालयाकडे चालू लागले. सारा लवाजमा त्यांनी दूर ठेवला. ते मंदिरात आले. तो विरक्त अन् अलिप्त बैरागी अंगाला राख फासून एका धुमसत्या धुमीपुढे ईश्वरचिंतनात एकाग्र झाला होता. हाती माळ होती. काखेत कुबडी होती.

पंतांनी त्याला दंडवत घातले. स्वामीजींनी डोळे उघडले. समोर एक दुःखी मानव दंडवत घालून अश्रू ढाळीत होता. म्हणत होता—

" महाराज मला या व्याधीतून सोडवा ! "



पंत, आमच्यापाशी आहे एक तराजु ! त्या तराजुत हत्ती घाला !

त्या विराग्याने आईच्या मायेने म्हटलं,

" बेटा ऊठ ! ईश्वर तुझं कल्याण करील ! "

–अन् मुरारपंत तिथेच राहिले. त्या सत्पुरुषाच्या सहवासात दिवस आणि आठवडे उलटले. अन् एके दिवशी पंतांच्या लक्षात आलं की, आपली व्याधी नाहीशी झाली आहे ! आपण पूर्ण निरोगी झालेलो आहोत. पंतांना अपार आनंद झाला. पंत गहिवरून स्वामीजींना म्हणाले,

" महाराज मी आपल्यासाठी काय काय करू? सांगाल ते ते करतो ! "

तो विरागी सत्पुरुष हसला आणि म्हणाला,

" काही करू नकोस बेटा ! माझ्यासाठी काहीही करू नकोस. हा भगवान शिवसंगमेश्वर सर्व काही करीत आहे. तू एकच कर. "

" आज्ञा करा महाराज ! "

" हे कोलमडलेलं मंदिर पुन्हा बांध ! "

मुरारपंतांना आनंदच झाला. बांधकामाला आरंभ झाला. पंतांनी घागरींनी पैसा ओतला. मंदिर चढू लागले. संगमावर सुंदर घाट उठू लागला. शिखर निळ्या आकाशात खुलू लागले. मंदिर पूर्ण झाले. पंतांनी ठरवले की, आता या मंदिराच्या बांधकामाचा सांगता समारंभ थाटात करायचा. अपार दानधर्म करायचा. कळस चढवायचा. महापंडि-

तांचा सत्कार करायचा. त्यांना अग्रहार द्यायचे. जनांच्या मुखी अन्नाचा गोड घास घालायचा. हत्तीच्या वजनाइतकी सम्पत्ती दान करायची! गजतुळा करायची! ठरले! तयारी सुरू झाली.

भीमा-इंद्रायणीच्या संगमावर प्रचंड यात्रा लोटली. होमांचे धूर आणि वेदांचे मंत्र चढत्या वाढत्या ऊर्मीने उठू लागले. घंटांच्या निनादांनी गाभारा घुमला. वाद्ये दणाणू लागली. पंतांच्या खास आवातनावरून बडे बडे सरदार या समारंभासाठी आले होते. त्यातच होते पंतांचे जिगर दोस्त शहाजीराजे भोसले. निजामशाहीचे मुख्य वजीर शहाजीराजे भोसले.

पंतांनी सारे धार्मिक विधी यथासांग व थाटामाटात केले. अनेक दाने दिली. अन् वेळ आली गजतुळेची! हत्तीच्या वजनाइतकी दौलत तुळा करून दान करायची होती. संकल्प सुटलेला होता. आता प्रत्यक्ष दानाची वेळ आली. अन् मग पंतांच्या आणि सर्वांच्याच पुढे प्रश्न उभा राहिला की, हत्तीची तुळा करायची कशी? खरंच की! हत्तीची तुळा कोणत्या तराजूत कराची? मोठाच प्रश्न! हत्ती तयार होता. पण तराजू? मुरारपंत तर गोंधळून गेले. सारे शास्त्री-पंडित अबोल होऊन एकमेकां-कडे पाहू लागले. डोकी खाजत होती. अन् लगेच बधीर होत होती.

शहाजीराजे घाटाच्या पायरीवर उभे होते. गजतुळेचा प्रश्न सुटत नव्हता. कुणी काही कुणी काही सुचवीत होते. पण ते कुणाच्याच बुद्धीला पटत नव्हतं. शहाजीराजे खळाळणाऱ्या भीमा-इंद्रायणीकडे बघत होते. समोर मोठा डोह हेलावून वाहात होता. एक नाव संगमाच्या डोहात डोलत होती. नावाडी नाव वल्हवीत ऐलतीरावर येत होता. राजे बघत होते. त्यांच्याही डोक्यात प्रश्न नाचत होता, हत्तीची तुळा करायची कशी?

तेवढ्यात मुरारपंत घाईघाईने शहाजीराजांकडे आले आणि म्हणाले,

"राजे एका गोष्टीत सारं अडलंय. हत्तीची तुळा करायची कशी?"

शहाजीराजे किंचित हसले आणि म्हणाले,

"पंत, आमच्यापाशी आहे एक तराजू! त्या तराजूत हत्ती घाला!"

"तराजू आहे? काय म्हणता! तराजू आहे?"

"जी!"

आणि शहाजीराजांनी त्या नावाड्याला ती नाव त्या घाटाला आणून लावायची खूण केली. ती नाव आली, नाव रिकामी होती. राजांनी हत्ती आणण्यास सांगितले. पंतांनी हत्ती आणवला. तो धिप्पाड हत्ती झुलत झुलत घाटाच्या पायऱ्या उतरून आला. राजांनी इशारा करताच तो स्वतःचा व नावेचा तोल सावरीत नावेत चढला. हत्तीच्या वजनाने नाव जरा खाली गेली व पाण्याची पातळी वर चढली. शहाजीराजांनी नावेचा जेवढा भाग पाण्याखाली गेला होता तेवढ्या भागावर गेरूने रेघ मारून खूण केली. नंतर हत्तीला बाहेर काढले. पंत आणि शास्त्री-पंडित आश्चर्याने हे बघत होते. खूण केलेल्या त्या नावेत दगड भरण्याचा हुकूम राजांनी सोडला! आणि गेरूच्या रेघेपर्यंत नाव पाण्याखाली जाईल इतके दगड नावेत भरण्यात आले. नंतर ते दगड बाहेर काढण्यात आले. मग राजे म्हणाले,


"पंत, या दगडांच्या वजनाइतकं तुमच्या हत्तीचं वजन आहे! तेव्हा या दगडांच्या वजनाइतके दान तुम्ही करा! घाला तराजूत!"

पंत राजांची ही चतुराई पाहून विस्मित झाले. खूष झाले. दगडांची तुळा करून दान करण्यात आले. जो तो राजांची स्तुती करीत होता. कौतुक गात होता. पंत त्या नावेकडे बघत राजांना म्हणाले,

"राजे, हा तुमच्या अकलेचा तराजू! ही गजतुळा तुमच्या अक्कल-हुशारीमुळेच घडू शकली. आजपासून ह्या नागरगावाचं नाव 'तुळापूर'! 'तुळापूर'!

हेच ते पुण्याजवळचे भीमा-इंद्रायणीच्या संगमावरचे तुळापूर!

○



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ ॲटोमॅटिक मंत्री

काम्प्युटरची अगाध लीला किती वर्णावी ? अस्मादिकांनी आतापर्यंत अनेकदा काम्प्युटर सहस्रनाम जपले आहे. तरीदेखील काम्प्युटरची कर्तबगारी अंगुष्ठमात्र उरतेच. परवा जनसंघाचे नेते अटल बिहारी वाजपेयी यांनी तर असे सुचविले, की हिंदुस्थानातील सर्व मंत्रीमंडळे काम्प्युटर मंत्र्यांची असावीत. म्हणजे प्रत्येक बाबतीत धोरण चुकण्याचे सरकारी रडगाणे थांबेल. कल्पना अनेक दृष्टींनी रम्य आहे यात शंका नाही. एक तर " मला मंत्री केले नाहीत तर मी विरोधी पक्षाला जाऊन मिळेन " अशी धमकी एकाही कॉंप्युटरने दिल्याचे ऐकिवात नाही. कदाचित टोपी फिरवण्याची अवघड मानवी कला या यंत्र-मंत्र्याला अवगत होणे शक्य नसावे. दुसरे म्हणजे काम्प्युटरला मधून मधून नवकाव्य करायचा अनिष्ट छंद असला तरी भाषणे देण्याचा सरकारी हव्यास असलेला दिसत नाही. त्यामुळे वर्तमानपत्रांत वर्तमान वाचायच्या ऐवजी मंत्र्यांची भाषणे वाचावी लागतात ती लागणार नाहीत. शिवाय काम्प्युटरांचा मुखडा फारसा दर्शनीय नसतो. तेव्हा सफाई-सप्ताहात हातात झाडू घेतलेले काम्प्युटर महोदय, चपलांच्या दुकानाचे उद्घाटन करीत असताना नामदार काम्प्युटर, आपल्या बंगल्याच्या किचन गार्डनमध्ये माळचाने लावलेल्या भाजीपाल्याला फोटोपुरते पाणी घालणारे श्री. काम्प्युटर इत्यादी निरनिराळचा पोझमध्ये लोकांच्या डोळचात भरण्याचा प्रयत्न करायला एखादा काम्प्युटर-मंत्री धजेल असे मला वाटत नाही.

पण दुसरीकडून विचार केला तर काम्प्युटर मंत्रिमंडळाच्या हाती राज्यकारभार सोपविण्यात काही जबरदस्त धोकेही आहेत. उदाहरणार्थ, एखादी समस्या (न) सोडविण्यासाठी सरकारी शिरस्त्याप्रमाणे समिती न नेमता काम्प्युटर-मंत्र्याने ती खरोखरीच चटकन सोडवून टाकली तर ? दुसरे म्हणजे जनतेला दिलेली वारेमाप आश्वासने विसरण्याची सरकारी कला काम्प्युटरला साध्य करता आली नाही तर ? अन् मुख्य म्हणजे एकूण सरकारी कारभारात मानवी भोंगळपणा जाऊन यांत्रिक व्यवस्थितपणा आला तर ? नकोच तो धोका ! मला वाटते काम्प्युटरांनी एखादा पक्ष काढल्यास त्याच्यावर ताबडतोब बंदी घालावी, म्हणजे पुढे मागे त्या पक्षाला बहुमत मिळून काम्प्युटर मंत्री गादीवर येण्याची धास्ती नको.

## ☐ समुद्र-मंथनात न मिळालेली फाईल

प्रत्येक माणसाला काही तरी छंद असतो, अन् सरकार हे माणसांचेच झालेले असल्याने सरकारलाही छंद असतो. पण निरनिराळया माणसांना निरनिराळे छंद असतात तर प्रत्येक सरकारला बहुधा एकच आवडता छंद असतो व तो म्हणजे समित्या नेमणे. परवा कोणीतरी हिशेब लावला की हिंदुस्थानवर स्वातंत्र्य कोसळल्यापासूनच्या वीस वर्षांत निरनिराळया गोष्टींवर अहवाल तयार करण्यासाठी सुमारे १६५ सरकारी समित्या नेमण्यात आल्या आहेत व प्रत्येक समितीने आपला अहवाल सादर करायला सुमारे दोन वर्षे लावली आहेत. आता तुम्ही म्हणाल एवढी तीनशे-सव्वातीनशे "समिती-वर्षे" विचार करून अखेर फल-निष्पत्ती काहीच दिसत नाही. चूक ! समिती नेमल्याने फलनिष्पत्ती होते हा तुमचा सिद्धान्तच मुळात चूक आहे. कारण समिती ही फलनिष्पत्तीसाठी नसून काही मंडळींच्या पोटापाण्याच्या तरतूदीसाठी (उन्हाळयात त्यांना सरकारी खर्चाने सिमला-श्रीनगरला जाता येण्यासाठी) असते. शिवाय निसर्गात ज्याप्रमाणे एक अमीबा विभागून त्याचे दोन अमीबा होतात त्याप्रमाणे सरकारात एका समितीच्या पोटातून दोन उप-समित्या निघतात. हा उप-कार चक्रवाढ गतीने वाढत जाऊन अखेर एक बाळसेदार अहवाल तयार होतो. देव-दानवांना समुद्रमंथन करूनही न सापडलेले हेच ते पंधरावे रत्न-अहवाल !

## ☐ एअर-कंडिशन्ड परलोक-प्रवास

इंग्लंडमध्ये तीन मुलांची आई असलेली एक बाई शंभर दिवस स्वत:ला एका थडग्यात जिवंत पुरून घेणार आहे. हे थडगे एअर-कंडिशन्ड असून आत बिछाना, दिवा व रेडिओ आहे, आणि बाईला जेवण व वर्तमानपत्र नळीतून पुरविण्याची सोय आहे. अहाहा ! फिरूनी जन्मा यावे परी असल्या आलीशान थडग्यात मरावे ! नाहीतरी दिल्ली-मुंबईचा प्रवास करणारा माणूसही एअर-कंडिशन्ड डीलक्स पसंत करतो, तेव्हा लांबलचक परलोक-प्रवासाची रंगीत तालीम करणाऱ्या या बाईला एअर-कंडिशन्ड थडग्याची आवश्यकता भासावी यात नवल नाही. आणि कोठल्याही प्रवासात जेम्स बाँड किंवा पेरी मेसन हवाच, तेव्हा थडग्यात दिवाही पाहिजे. वाकून वाकून कंटाळा आलाच तर "आपकी फर्माइश" साठी रेडिओ आहेच. अन् शेवटी आधुनिक माणूस जिवंत असो की मेलेला, पृथ्वीवर असो की पृथ्वीच्या आत, स्वर्गाच्या वाटेवर असो की नरकाच्या-त्याला सकाळचे वर्तमानपत्र हवेच. रामाचे नावघेऊन डोळे मिटायच्या ऐवजी जगजीवनरामाचे नाव वाचून डोळे मिटायचे दिवस आले आहेत.

O

अन्नपूर्णा आणि धवलगिरी ( पान १६ वरून चालू )

" मेरा ख्याल, दो घंटा लगेगा । हमारे लोग एक घंटेमे पहुँच जाते है । लेकिन आपके लिये दो-अढाई घंटा लगेगा । "

आम्ही चालत राहिलो. डोंगरावरून वाट तुडवीत एक खिंड ओलांडली आणि उताराला लागलो. या उतारावर मात्र दाट जंगल लागले. लुमले या नीटनेटक्या गावात " नमस्ते " अशा सामुदायिक गलक्याने छोट्या मंडळींनी आमचे स्वागत केले. पण अजून बिरेथाटी येत नव्हती. संध्याकाळ संपून रात्रीची चिन्हे दिसू लागली. डोंगरात, वळचणीला दोनच घरे दिसली. त्यापैकी एकात प्राध्यापक डोकावले. फडफडफड करीत पंधरा-वीस कोंबड्या एकदम काळोखातून बाहेर पडल्या. आम्ही दचकून मागे सरकलो. पण सुदैवाने भट्टीवालीने आम्हाला जागा द्यायचे कबूल केले. केरसुणी घेऊन तिने जागा स्वच्छ केली आणि आम्ही आमच्या पथाऱ्या पसरल्या. कुक्कुटसेनेला आमचे अतिक्रमण अजिबात पसंत पडले नव्हते. या ना त्या मार्गाने आत शिरकाव करण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालू होता. हुश्श ! करीत पडलेल्या वर्तकांच्या छातीवर एवढ्यात एका कोंबड्याने उडी मारली. ' हे मात्र फार झालं हं ! ' म्हणत वर्तक ताडकन उभे राहिले. पण त्यांची मुख्य अडचण दूर झाली होती. रात्रीच्या जेवणाला चांगले सायीचे ग्लास-ग्लास दही भट्टीवालीने आम्हांला वाढले.

मोदी खोला या प्रवाहाच्या काठी वसलेल्या निरेथाटीला यावयास दुसऱ्या दिवशी आम्हास दीड हजार फूट डोंगर उतरावा लागला. खोला आला म्हटलं की दोन्ही बाजूंना दोनतीन हजार फुटांचे चढ-उतार आलेच. मोदी खोल्यावरचा झुलता पूल ओलांडून आम्ही गावात प्रवेश केला. पण शंभर-दीडशे खेचरांनी सारा रस्ता व्यापून टाकला होता. त्यांच्या गळ्यातल्या मोठ्या घंटा किणकिणत होत्या. खेचरवाले त्यांच्या पाठींवर ओझी चढवीत होते. या प्रदेशातील वाहतुकीची साधने म्हणजे खेचर आणि घोडा. नाही तर माणूस !

" आप मराठा हैं ?"

आम्ही चमकून वर बघितले. दुकानदार विचारीत होता. सैन्यात नोकरीस असताना तो महाराष्ट्रात होता. त्याने आमची चेहरेपट्टी बरोबर ओळखली. बिरेथाटी गावातील लोक सधन वाटले. अंगात टेरिलिन शर्ट, हातात उंची घड्याळे, घरे दुमजली, लाकूड व चुन्याचे व्यवस्थित बांधकाम केलेली.

बिरेथाटीनंतर पुनश्च चढाला सुरुवात झाली. मी आजूबाजूला पाहत होतो. डोंगरांवर उंच उंच जागी खेडी वसली होती. पण डोंगर एवढे विशालकाय की त्यांच्या छाताडावरची ती घरे अगदीच चिमुकली वाटत होती. पश्चिमेकडील दाट जंगलातून डोंगरावरून उड्या मारीत एक प्रवाह खाली मोदी खोल्याला मिळण्यास जात होता. इतके स्वच्छ, शीतल पाणी पाहिल्यावर थोडेच राहवते. यथेच्छ डुंबलो.

पण नंतर मात्र हड्डि चांगलीच नरम झाली. चढ कुठे संपतोय असं चिन्ह दिसेचना.
"आज घोडेपानी जायेंगे !" प्राध्यापक निश्चयाने म्हणाले.

"ऊऽऽऽ ! बहोत जंगल है साब । भालू होता है, शेर होता है । शामको जंगल पार करना ठीक नही ।" आमच्या हमालांना अंतराचा अंदाज नीट करता येतो अशी आमची खात्री पटत चालली होती. कारण तो प्रचंड चढ चढता चढता संध्याकाळ झाली. सात हजार फूट उंची आम्ही गाठली. घोडेपानी अजून पाच मैल दूर होते.

समोरच्या वृक्षावर माझे सहज लक्ष गेले. नजर बारीक करून मी पुन्हा बघितलं. दुर्बिण डोळ्याला लावली. नक्कीच ! तो गरुड होता. हिमालयातील सुवर्ण गरुड. मी जवळ गेलो. बराच वेळ पाहत बसलो. आणखी एका दुर्मिळ पक्षाने दर्शन देऊन मला उपकृत केले होते.

शेवटी उलेरी गावात मुक्काम करायचा असं ठरलं. भट्टीच्या शोधार्थ सगळं गाव पालथं घातलं पण औषधाला कुठं पुरुष माणूस आढळेना. मधूनच चिलीम ओढणारी एखादी म्हातारी डोकवायची.

"एकजात अफीमबाज बायका !" वर्तक म्हणाले. गावही एकूण गलिच्छच. एका छोटयाशा झोपडीत कशीबशी जागा मिळाली.

सकाळी उलेरी गाव सोडलं आणि थोडयाच वेळात घनदाट जंगलात रस्ता शिरला. उंच उंच, विप्पाड वृक्ष आणि त्यांवरून लोंबकळणाऱ्या हात-हात जाडीच्या कणखर वेली. मला टारझनची आठवण झाली. मधूनच ऱ्होडोडेंड्रॉनचे डेरेदार झाड मन वेधून घेई. कसल्यातरी चमत्कारिक सुगंधाने वातावरण भरून गेले होते. चित्र-विचित्र रंगांची सुंदर सुंदर फुलपाखरे जंगलात चमचम करीत होती. एका मोठ्याशा फुलपाखराला मी पकडलं. त्याच्या पंखांच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत लांबी (wing-span) साडेपाच इंच भरली. वर्तकांना हे जंगल म्हणजे पर्वणी होती. "ओऽहो ! वंडरफुल ! व्हेरी रेअर." इत्यादी उद्गारांबरोबर त्यांचा कोयता वेगाने काम करीत होता.

समोरून दोन माणसे येताना दिसली. गौरकाय. एकमेकांजवळून जाताना आम्ही एकमेकांना 'हॅलो !' म्हटलं.

"ती उजवीकडची बाई होती. लक्षात आलं तुमच्या ?" बडव्यांनी मला विचारलं.

"हॅट ! शक्य नाही."

मागून त्यांचे हमाल आले. एकाच्या पाठीवरच्या टोपलीत लहान गोरं मूल होतं. आता शंकाच नव्हती. पण मला तरी कसं ओळखणार. अंगात शर्ट आणि पॅण्ट व केस कापलेले !

घोडेपानी नऊ हजार फूट उंचीवर आहे. गाव म्हणजे ईन मीन तीन झोपडया.

पण कोठूनही आलात तरी तीन-चार हजार फूट चढावं तेव्हा कुठं येथे येऊन पोचता. इतका चढ चढल्यावर घोड्यांना आणि खेचरांना ' पाणी पाणी ' झालं, नाही तरच नवल. इथली भट्टीवाली मोठी सुग्रण. बांबूच्या कोवळ्या देठांची रुचकर भाजी तिनं आमच्यासाठी खास बनवली.

नमुने गोळा करण्याचं आमचं काम चालूच होतं. ऱ्होडोडेंड्रॉनच्या राईतून हिंडताना मला एक सुंदर गुलाबी फूल सापडलं. ऱ्होडोडेंड्रॉनचे फूल अजून न मिळाल्यामुळे वर्तक अस्वस्थ होते. मी मोठ्या अदबीने त्यांना ते फूल नजर केलं. " वंडरफुल !" असा आनंदोद्गार काढीत शास्त्रज्ञाच्या अलिप्ततेने वर्तकांनी ते फूल दोन कागदांमध्ये ' प्रेस ' करून टाकलं !

आता रस्त्याला सतत उतार होता. गंडकी नदीला भेटण्यास आम्ही चाललो होतो. दुपारी तीन वाजता फलाटे गाव लागलं. दुतर्फा पसरलेल्या भात-खाचरांतून पायवाट जात होती. लांब पानांचे डौलदार विलो वृक्ष वाऱ्यावर झुलत होते. एखाद्या बगीचातून तर आपण चाललो नाही ना, अशी शंका वाटत होती.

तातपानीला मुक्काम करायचा बेत होता. पण विचारलं तर लोक सांगत " और दो कोस है साब । " यांचा कोस संपतच नव्हता. शेवटी सिरवा गावात थांबलो. गाव मोठं होतं. एक हॉटेल होतं. सनमायका बसविलेली टेबलं आणि ॲल्युमिनियमच्या आधुनिक फोल्डिंग खुर्च्या. हॉटेलवाली मिस्किल होती. चांगली भट्टी कोठे आहे हे दाखवितांना " इधर छोकरी भी मिलती है । " ही अनाहूत माहितीही तिने डोळे मिचकावीत पुरविली. ( अपूर्ण )

## ☐ नोकरी करणाऱ्या मातांचा प्रश्न

झेकोस्लोव्हाकियातील कामकरी वर्गात ४५ टक्के प्रमाण स्त्रियांचे आहे, त्यामुळे त्या देशात " कामकरी मातांचा प्रश्न " ही एक नवीन समस्या उभी झाल्याची माहिती थोड्या दिवसांपूर्वी तेथील स्त्री-संघटनेच्या उपप्रमुख फिशेरोवा यांनी भारतभेटीत दिली. समान वेतन, नोकरीची समान संधी, मिळकतीवर समान अधिकार, बाळंतपणाची पगारी रजा इत्यादी स्त्री-हिताचे कायदे असूनही त्या देशातील आजच्या उद्योगप्रधान समाजात स्त्रीचे कामकरी व गृहिणी म्हणून असलेले स्थान नीट समजावे म्हणून खरा प्रयत्न करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. हे कार्य करण्यासाठीच " झेकोस्लोव्हॅक युनियन ऑफ वीमेन " ही संस्था नुकतीच स्थापन करण्यात आली आहे. कामकरी स्त्रियांच्या बालकांची निगा राखणे, कामकरी स्त्रियांना अधिक शिक्षण देण्याची सोय करणे व स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी वेतन देण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध झगडणे इत्यादी कार्याला ही संस्था वाहिलेली आहे.

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## जुलै महिन्याचे राशीभविष्य

**मेष :** तुमच्या पराक्रमातील ग्रहांची बैठक अजूनही १५ दिवस चालेल. त्या बैठकीतील ठराव–योजना–चर्चा–सारे काही तुम्हांला अनुकूल असेच आहे. तुमचं अधिकाधिक भलं कसं करावं हाच मुळी बैठकीमागील हेतू आहे. यामुळे हा महिनाही आपण खूपच गाजवून सोडाल. नवे क्षेत्र हस्तगत कराल. नोकरी, धंदा शिक्षण, यासाठी स्थानांतर करण्याची योजना प्रत्यक्षात उतारवाल. या कालीच तुमच्या कर्तृत्वाला आगळी धार चढेल. प्रयत्नांची शिकस्त केलीत तर या वेळी आपणास हवं ते मिळवून घेता येईल. यांत्रिक क्षेत्रात, साहित्याच्या प्रांतात आश्चर्यकारक प्रगती घडवून आणाल.

दि. १ ते ३, ९ ते १५, १८ ते २२, २८ ते ३० हे सर्व काल अपेक्षित यश देणारे जाणवतील.

**वृषभ :** सध्या आपण प्रगतीकडेच वाटचाल करीत आहांत. आणि लवकरच जेव्हा रवि–मंगळादी ग्रह पराक्रमात येतील तेव्हा तर आपल्या प्रगतीचां वेग खूपच वाढलेला असेल.

तुम्हांला साडेसाती सुरू झाल्याचे तुमच्या कानी आले असेल पण या अगांतुक शनीला भीक घालण्याचे मुळीच कारण नाही. अजुनी ८–१० महिने तरी शनी तुमच्या वाटेस जाणार नाही.

पहिला पंधरवडा यथातथाच. दुसऱ्या पंधरवड्यात–तुम्हाला हवं ते प्रतिज्ञेने मिळवून दाखवाल. जुलै अखेरला अनेक स्थित्यंतरे, स्थलांतरे घडून यावीत. नव्या उत्साही क्षेत्रात पदार्पण घडेल, व्यावसायिक जगात प्रतिष्ठा मिळू लागेल.

दि. २ ते ५, ११ ते १८, २३ ते २९ या काली बऱ्याच अपेक्षा सफल व्हाव्यात.

**मिथुन :** रवि–मंगळादी अनेक ग्रह आज जरी तुमच्या राशीत दिसत असले तरी–त्यांनी पुढील प्रवासाचे प्रस्थान केव्हाच काढून ठेवलेले आहे, तुम्हांला अधिक त्रास द्यायला त्यांनाच सवड नाही.

पहिल्या पंधरवड्यात थोडीफार धावपळ धडपड करावी लागेल. दुसऱ्या पंधरवड्यात मात्र सारे काही शांत प्रसन्न दिसू लागेल.

गेल्या महिन्यातील अफाट आणि अनावर खर्चाला आता आळा बसेल. नव्या योजना आकार घेऊ लागतील, हुकलेली संधी पुन्हा लाभेल.

व्यावसायिक योजना अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल व्हाव्यात.

दि. १ ते ५, १२ ते १८, २३ ते २८ या काली आपली कामे वेग घेऊ लागतील.

**कर्क :** हा जुलै महिना खूपच धावपळीचा, दगदगीचा जाणवला तरी नेत्रदीपक यश पदरी टाकून जाईल. व्ययस्थानच्या ग्रहांचा धिंगाणा आता संपुष्टात येण्याची लक्षणे दिसू लागतील. त्यांनी आजवर तुमचे सांपत्तिक अंदाजपत्रक साफ चुकविले, कधी ध्यानीमनी नव्हते असे प्रचंड खर्च निर्माण केले, गुरूच्या कृपेने वेळ मात्र भागून गेली. दुसऱ्या पंधरवड्यात आपण परिस्थितीवर पूर्ण ताबा ठेऊ शकाल. शारिरिक मानसिक ताण मात्र इतक्यातच कमी होईल असे दिसत नाही.

वैद्यकीय, रासायनिक क्षेत्रात हेवा करण्यासारखे यश मिळवाल. संशोधन क्षेत्राशीही तुमचे घनिष्ठ संबंध जुळून यावेत. शेती, खते, धान्योत्पादन या बाबतीतही आपणास अधिक लक्ष घालावे लागेल.

दि. ३ ते ७, १५ ते २३, २७ ते ३१ अनेक प्रगत घटना या वेळी घडाव्यात.

**सिंह :** पहिला पंधरवडा अधिकाधिक चांगला तर दुसरा पंधरवडा कमालीचा ताणाचा. असे या महिन्याचे द्विधा स्वरूप आहे. जी काही कामे उरकून घ्यायची राहिली असतील ती सारी पहिल्या पंधरवड्यातच उरकून घ्यावी लागतील. रवि-मंगळांनी एकदा व्ययस्थानी प्रवेश केला की, मग परिस्थिती तुमच्या हाती राहणार नाही.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान आताच ठेवावे लागेल. अनाहूत खर्च पुढे उद्‌भवण्याची शक्यता आहे, अशी अंधुकशी जाणीव पहिल्या पंधरवड्यात होऊ लागेल.

राजकीय आघाडी मात्र तुम्हांलाच सांभाळावी लागेल. समाजातील विधायक कार्यक्रमासाठी सतत प्रयत्नशील बनावे लागेल.

दि. ३ ते ९, १५ ते २२, २५ ते २७ हा काळ अनपेक्षित यश देणारा दिसेल.

**कन्या :** गुरू-शनीसारखे विशाल तेजोगोल माणसाचे जीवन घडवीत असतात. आणि त्या दोन्हीही ग्रहांची सहानुभूती सध्या आपण गमावून बसला आहात. यामुळे या महिन्यात विशेष संस्मरणीय असे काही घडेल, ही आशा खोटी. नाही म्हणायास जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात रवि-शुक्रादी अनेक ग्रह आपल्या लाभस्थानी येणार असल्यामुळे ते तुमची धावपळ अगदीच वाया घालवणार नाहीत इतकेच.

वाढत्या जबाबदाऱ्यांचे ओझे असह्य वाटू लागेल, नको त्या माणसाशी संबंध यायला लागतील. अपेक्षेप्रमाणे सारे घडेलच याची खात्री वाटेनाशी होईल. थोडे फार स्वास्थ्य, यश लाभेल १६ ते २६ जुलै याच कालखंडात.

दि. २ ते ५, १० ते १३, १६ ते २६, २८ ते ३१ हे काल अपेक्षित यश देणारे जाणवतील.

तूळ : सध्याची आपली ग्रहस्थितीच अशी आहे की, हवंते आणि हवं तेवढं आपण मिळवूं शकाल. कला-क्रीडा या दोन्हीही क्षेत्रांत आपण विक्रम करून दाखवाल.

पहिल्या पंधरवडयांत सभासंमेलने गाजवाल, नोकरीधंद्यांत अत्युच्च प्रतिष्ठा मिळवाल, साहित्य, राजकारण अर्थशास्त्र—या क्षेत्रांशी आपला संबंध असेल तर त्यात आपणांस प्रतिस्पर्धीच उरणार नाही.

या महिन्यात वरचेवर प्रवास घडेल. बढती बदलीची लक्षणे स्पष्टपणे दिसून यायला लागतील. वृत्तपत्रीय क्षेत्रांत विशेष काही करून दाखवाल.

आपल्या जीवनांतील हा एक अत्युत्तम प्रगतीचा कालखंड म्हणून चिरंतन स्मृतीचा जाणवेल.

दि. १ ते ५, १३ ते १९, २४ ते ३० या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

वृश्चिक : आठव्या रवि-मंगळांची व्यथा जुलै मध्यापर्यंत तरी तीव्र स्वरूपाने जाणवत राहील. जुल अखेरच्या आठवडयात आपण साऱ्या व्यथाविवंचनांतून मुक्त होणार आहात. तोपर्यंत नम्रता-संयम-शांतता यांचे धडे आपणांस गिरवावे लागतीलच.

उद्योगधंद्याचे तंत्र बदलून पाहिले, आचारविचारांचा मंत्र पालटून पाहिला, निर्धाराचे खड्ग हाती वापरूनही पाहिले, पण म्हणावे तसे यश कुठेच मिळाले नाही. अष्टमातील ग्रहानी तुम्हांला निष्प्रभ करून टाकले.

दुसऱ्या पंधरवडयापासून परिस्थिती अनुकूल व उत्साही बनू लागल्याचा प्रत्यय यायला लागेल. आणि २६ जुलैला मंगळाचे भाग्यस्थानी आगमन घडताच—तुमची क्राती वेग घेऊ लागेल, अपेक्षा साफल्याचा साक्षात्कार घडू लागेल.

दि. २ ते ७, १० ते १७, २३ ते ३१ हा अपेक्षित यश देणारा काळ.

धनु : रवि-मंगळादी ग्रह आज सप्तमांत आहेत काही दिवसांनी अष्टमस्थानी जातील.

ही त्यांची वाटचाल तुम्हांला क्लेशदायकच ठरेल. म्हणून या जुल महिन्यासंबंधी तुमच्याबद्दल मी विशेष चांगले असे काही सांगू शकत नाही.

पहिल्या पंधरवडयात वादविवाद, शत्रुत्व यांना ऊत येईल तर दुसऱ्या पंधरवडयांत—अनारोग्य, सांपत्तिक ताण तीव्र स्वरूप धारण करील. काही दिवस हे त्रासदायक प्रसंग सहन करण्यावाचून गत्यंतरच नाही. मंगळासारख्या हट्टवादी ग्रहापुढे कुणाचेच काही चालत नाही.

नोकरीधंद्यांत कोणाशीच पटेनासे होईल, इष्टमित्रही चमत्कारिकपणाने वागू लागतील.

यांत्रिक धंद्यातील व्यक्तींनी यावेळी सतत सावधगिरी बाळगायला हवी.

दि. १ ते ७, १० ते १७, २७ ते ३१ थोडे फार अनुकूल दिवस एवढेच.

**मकर :** जुलै आरंभी षष्ठस्थानी असलेले अनेक ग्रह–जुलै मध्यानंतर अष्टमस्थानाकडे सरकू लागतील–याचाच सरळ अर्थ असा की, आपला काल अनुकूलतेकडून प्रतिकूलतेकडे झपाट्याने जाऊ लागलेला आहे. या बदलत्या कालाची दखल घेतली नाहीत तर काल तुम्हांला क्षमा करणार नाही. कालाची पावले ओळखून वागाल तरच तुमचा निभाव लागेल.

प्रत्यक्षात तसे फार मोठे अनिष्ट काही घडणार नसले तरी, मानसिक ताण कमालीचा वाढेल, यश पदरी पाडून घेण्यास कमालीच्या बाहेर झगडावे लागेल. विरोधकांच्या संघर्षाला सतत तोंड द्यावे लागेल. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून सतत दक्ष राहावे लागेल.

दि. २ ते ८, १२ ते १८, २८ ते ३१ या काली अपेक्षित लाभ पदरी पडावेत.

**कुंभ :** गेल्या महिन्यापासूनच तुमचा अनिष्ट काल ओसरू लागलेला आहे. शिवाय तुम्ही आता साडेसातीमधूनहि मुक्त झाला आहांत.

प्रामुख्याने रविहर्शल लाभयोग होतोच. (१८ जुलै) अनपेक्षितपणे आपल्या कार्यांना गती मिळू लागतील, सांसारिक प्रसन्नता, व्यावसायिक प्रगती आणि सामाजिक प्रतिष्ठा या अशा आणखी कित्येक गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडून यायला लागतील. प्रगतीच्या नव्या वाटा दिसू लागतील, स्थावरासंबंधीचे प्रयत्न यशस्वी ठरतील, शैक्षणिक क्षेत्रात मनाप्रमाणे सारे काही घडेल. जुलैचा मध्यकाल संस्मरणीय प्रगतीचा ठरेल.

दि. ५ ते ९, १३ ते २०, २७ ते ३१ या काली अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील.

**मीन :** गेल्या महिन्याच्याच व्यथा जुलैच्या पहिल्या पंधरवड्यांतहि अनुभवाव्या लागतील. हे सर्व ग्रह पंचमात गेले की, परिस्थितीत समाधानकारक पालट झाल्याचा प्रत्यय येऊ लागेल. सांपत्तिक पेचप्रसंग सोडविण्यात फारसे यशस्वी व्हाल असं दिसत नाही. नोकरी धंद्यांतील प्रगतीचे स्थान अवघड करूनहि तुम्हाला लाभण्याची शक्यता फारच कमी. कलाक्षेत्रात–नाट्य वाङमयाच्या प्रांतात आजवर आपण जे प्रयत्न केले ते सर्व वाया जातात की काय अशी भीति वाटू लागेल.

दि. १६–१७ पासून अनेकांचे सहकार्य लाभू लागेल, थोडेफार व्यावसायिक यश पदरी पडू लागेल.

दि. ७ ते १०, १६ ते २६, २८ ते ३० या काली अल्पस्वल्प यश पदरी पाडून घेता येईल.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

# स्वतंत्र आर्थिक चिंतन....

'सर्व वाद संपवून हिंदुस्थान बनवा,' 'को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ', 'कल्याणकारी राज्य', अशा घोषणा करून झाल्यावर आता सरकारची समाजवादी पद्धतीची घोषणा चालू आहे. वस्तुस्थिती अशी आहे की यापैकी काहीही सरकारला नको आहे. कारण मदत देणारे परकी देश भारताने कोणतेच तत्त्वज्ञान स्वीकारू नये असे इच्छितात; या देशातील योजना ट्रॅक्टर, खते इत्यादी वस्तूंच्या आधारे बनवू इच्छितात. अमेरिका, रशिया दोघेही या वस्तूंचा पुरस्कार करतात. अमेरिका ट्रॅक्टर आणि खतांचा तर रशिया बोकारो व पोलाद यांचा पुरस्कार करतात. माणूस, माणसाची तत्त्वज्ञाने, संपत्तीचे संबंध, व्यापार-शेती-कारखाने यांचे संघटन याबाबत रशिया-अमेरिका यापैकी कोणीही कधीच बोलत नाहीं. अमेरिका आणि रशिया दोघांनाही येथे एक खर्चीक आणि आधुनिक वर्ग निर्माण व्हावा आणि त्या वर्गाने या दोघांची धोरणे पुढे रेटावीत असे वाटते. दोघांच्या धोरणात फारसा संघर्ष नाही. दोघांनाही येथे स्थिरताच हवी आहे.
स्वतंत्र आर्थिक विकास अथवा स्वतंत्र आर्थिक चिंतन हे या नियोजनामुळे या देशात शिल्लकच उरलेले नाही. बाहेरून मदत घेऊन, कशीतरी हातमिळवणी करून एखाददुसरा कारखाना उभा करायचा आणि दुष्काळी स्थितीत कायमचे लोळायची लोकांना सवय लावायची, असे हे आमचे नियोजन आहे.

— डॉ. राममनोहर लोहिया

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.